सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

E-Mail : prajasattaknews24@gmail.com | RNI No. - MAHMAR 2023/84526 | Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - २९१ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ बुधवार दि. २४ डिसेंबर २०२५ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

# आता नगराध्यक्षांनाही मिळणार मताचा अधिकार

## सरकार कायद्यात सुधारणा करण्यासाठी काढणार अध्यादेश

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४मुंबई**

राज्य सरकारने आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या थेट निवडून आलेल्या अध्यक्षास सदस्यत्व देण्यासह मताचाही अधिकार देण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे भविष्यात स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये बहुमताचा प्रश्न उद्धवला तर नगराध्यक्षांना आपले मत योग्य त्या पक्षाच्या पारड्यात टाकून प्रकरण निकाली काढता येणार आहे. हा बदल सत्ताधाऱ्यांना अनुकूल असल्याचा दावा केला जात आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात आज राज्य मंत्रिमंडळाची बैठक झाली. या बैठकीत सामान्य प्रशासन विभाग, ग्रामविकास व पंचायत राज विभाग, महसूल व नगरविकास विभागाशी संबधित प्रत्येकी १ निर्णय घेण्यात आला. मंत्रिमंडळाने महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मध्ये अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे नगरपरिषदा व नगरपंचायतीच्या थेट निवडून आलेल्या अध्यक्षास सदस्यत्व मिळण्याचा मार्ग मोकळा होईल. तसेच त्याला मताचाही अधिकार मिळेल. नगर विकास विभागाचा हा एक महत्त्वाचा निर्णय आहे.



**निर्णयाचा काय होईल फायदा ?**

नगरपरिषदा आणि नगरपंचायतींच्या सदस्य म्हणून निवडून येण्यास पात्र असलेली व्यक्ती अध्यक्ष म्हणून निवडून येण्यास पात्र असते. त्यामुळे एखादी व्यक्ती अध्यक्ष म्हणून आणि त्याचवेळी सदस्य म्हणून निवडून येऊ शकते आणि दोन्ही पदावरही निवडून येऊ शकते. अशा व्यक्तिला दोन्ही पदांसाठी जनादेश मिळालेला असतो. म्हणूनच सदस्यांमधून अध्यक्ष म्हणून निवडून आलेली व्यक्ती सदस्य राहते आणि त्याचबरोबर अध्यक्ष व सदस्य म्हणूनही काम करते.

थेट निवडून आलेल्या आणि सदस्यांमधून निवडून आलेल्या अध्यक्षास जनादेश असतोच. त्यामुळे या सुधारणेनुसार आता अध्यक्ष म्हणून थेट निवडून आलेली व्यक्ती आणि सदस्य म्हणून थेट निवडून आलेली व्यक्ती एकाचवेळी दोन्ही पदे धारण करू शकते, अशी सुधारणा करण्यात येणार आहे. तसेच अध्यक्षाला सदस्य म्हणून एक मत देण्याचा अधिकार मिळणार आहे. अशा व्यक्तिला अध्यक्ष किंवा सदस्य म्हणून एक मत देण्याचा अधिकार असेल आणि मतांची बरोबरी झाल्यास, अध्यक्षाला निर्णायक मत देण्याचा अधिकार राहणार आहे, अशी सुधारणा या अधिनियमात केली जाणार आहे. त्याबाबतचा अध्यादेश काढण्यास बैठकीत मान्यता देण्यात आली.

# सध्या मुंबईपुरती उद्धवसेना-मनसे युतीची घोषणा, जागावाटपावर सस्पेन्स

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४मुंबई**

आगामी महापालिका निवडणुकीसाठी ठाकरे बंधू यांच्या उद्धवसेना-मनसे युतीची अधिकृत घोषणा आज करण्यात आली. उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेत युती जाहीर केली. परंतु सध्या ही युती मुंबईपुरती जाहीर केली असून इतर महापालिकांबाबत अद्याप चर्चा सुरू असल्याचंही समोर आले आहे. त्याशिवाय मुंबईत कोण किती जागा लढवणार याबाबतही ठाकरे बंधूंकडून सस्पेन्स कायम ठेवण्यात आला आहे. बंडखोरी रोखण्यासाठी दोन्ही ठाकरे बंधू सावधपणे पाऊले उचलत असल्याचं यातून दिसून येते.

या पत्रकार परिषदेत उद्धव आणि राज यांना जागावाटपाबाबत प्रश्न विचारला असता राज ठाकरे म्हणाले की, कोण किती जागा लढवणार, आकडा काय हे सांगणार नाही. महाराष्ट्रात सध्या लहान मुले पळवण्याची खूप टोळी फिरतेय. त्यात आणखी २ टोळ्या वाढल्या आहेत ते राजकीय पक्षामधील मुले पळवतात. जे निवडणूक लढवणार आहेत त्या सर्व उमेदवारांना दोन्ही पक्षांकडून उमेदवारी दिली जाईल. अर्ज कधी भरायचे हे कळवले जाईल असं सांगत राज यांनी जागावाटपावर सस्पेन्स कायम ठेवला.

## इतर महापालिकांचे काय ?




तर ही घोषणा सध्या मुंबईपुरती असली तरी बाकीच्या महापालिकांमधील युतीवर आज आणि उद्यापर्यंत शिक्कामोर्तब होईल. नाशिकमध्येही युती झाली आहे. काही ठिकाणी चर्चा सुरू आहे असं उद्धव ठाकरे यांनी पत्रकारांना सांगितले. आज आम्ही शिवसेना-मनसेची युती जाहीर केली आहे. इतर पक्षांसोबत चर्चा सुरू आहे. जे जे महाराष्ट्र प्रेमी आहेत. भाजपातील जे अस्सल मराठी प्रेमी आहेत तेदेखील युतीत येऊ शकतात. महाराष्ट्राला आणि मराठी माणसांना जे हवंय ते आम्ही पाहू असं सांगत उद्धव ठाकरे यांनी भाजपावर निशाणा साधला.

**माझ्याकडेही खूप व्हिडिओ आहेत**

दरम्यान, जुन्या व्हिडिओवरून हिंदुत्वावर प्रश्न विचारण्यात आला तेव्हा राज ठाकरे यांनी मुख्यमंत्र्यांचाही एक व्हिडिओ फिरतोय ज्याते अल्लाह हाफिज असं बोलतायेत. त्यामुळे या गोष्टी मला कुणी सांगू नयेत. माझ्याकडे खूप व्हिडिओ आहेत. समोरचे काय बोलतायेत त्यावर माझे व्हिडिओ तयार असतील असा सूचक इशाराच मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी विरोधकांना दिला आहे.

# आमचं हिंदुत्व अस्सल, फक्त मतांसाठी भगवी शाल घालणारे आम्ही नाहीत; मुख्यमंत्र्यांचे राज ठाकरेंना सडेतोड उत्तर

**विदर्भ प्रजासत्ताक दि. २४मुंबई**

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांनी आगामी महापालिका निवडणुकांसाठी अधिकृत युतीची घोषणा केली आहे. या घोषणेनंतर महायुती आणि ठाकरे बंधूंमध्ये जोरदार शाब्दिक युद्ध सुरू झाले आहे. मुंबईतील संयुक्त पत्रकार परिषदेत राज ठाकरे यांनी सत्ताधारी महायुतीवर, विशेषतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर कडाडून टीका केली. या टीकेला प्रत्युत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आम्ही फक्त मतांसाठी भगवी शाल घालणारे नाही, असा टोला लगावला.

युतीची घोषणा केल्यानंतर पत्रकार परिषदेत राज ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर निशाणा साधला. एक मुख्यमंत्र्यांचा व्हिडीओ फिरत आहे. त्यात ते अल्लाह हाफीज म्हणत आहेत, त्यांनी मला या गोष्टी सांगू नये, असं म्हणत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका केली. राज ठाकरेंच्या या टीकेला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही तितक्याच आक्रमकपणे प्रत्युत्तर दिले. फक्त निवडणुका आल्यावर किंवा मतांच्या राजकारणासाठी भगवी शाल पांघरून फिरणारे आम्ही नाही, असं मुख्यमंत्री म्हणाले.

**मराठी माणूस यांच्यासोबत नाही - मुख्यमंत्री**

ते एकत्रित आले याचा मला आनंदच आहे पण त्यामुळे फार काही राजकीयदृष्ट्या घडणार नाही.




पक्षाला निवडणुकीतील आपलं अस्तित्व टिकवण्याकरता जे करावं लागतं त्या दृष्टीने दोन पक्षांनी अस्तित्व टिकवण्यासाठी केलेली ही युती आहे. यामुळे फार काही परिणाम होईल असं मला वाटत नाही. कारण मुंबईकरांचा सातत्याने या मंडळींनी विश्वासघात केला आहे. मराठी माणसाला मुंबईच्या बाहेर घालवण्याचे काम यांनी केले. मराठी माणूस यांच्यासोबत नाही. अमराठी माणसांवर हल्ले केल्याने तेही यांच्यासोबत नाही. यांचा ट्रॅक रेकॉर्ड हा भ्रष्टाचाराचा, स्वहिताचा आहे. आता भावनिक बोलण्याला जनता भुलणारी नाही. त्यांनी अजून दोन चार लोक सोबत घेतले तरी मुंबईकर हे महायुतीचे काम पाहून, भविष्यातील काम बघून महायुतीच्याच पाठीशी उभे राहतील, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

# इस्रोने 6100kg चा अमेरिकी सॅटेलाइट केला लाँच

## भारतातून पाठवलेला हा सर्वात जड उपग्रह




**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४श्रीहरिकोटा**

भारतीय अंतराळ संशोधन संस्थेने (इस्रो) बुधवारी सकाळी आंध्र प्रदेशातील श्रीहरिकोटा

येथील सतीश धवन अंतराळ केंद्रावरून LVM3-M6 रॉकेट वापरून अमेरिकन उपग्रह ब्लूबर्ड ब्लॉक-२ चे प्रक्षेपण केले. ब्लूबर्डचे वजन ६,१०० किलोग्रॅम आहे, ज्यामुळे तो भारताने प्रक्षेपित केलेला आतापर्यंतचा सर्वात वजनदार उपग्रह बनला आहे.

ज्या LVM3 रॉकेटवर ते प्रक्षेपित केले गेले त्याचे वजन ६४० टन आहे, ज्यामुळे ते भारतातील सर्वात वजनदार प्रक्षेपण वाहन बनले आहे. त्याच्या उत्कृष्ट शक्ती, क्षमता आणि कामगिरीसाठी ते बाहुबली रॉकेट म्हणून ओळखले जाते.

ब्लूबर्ड ब्लॉक-२ हा पुढील पिढीचा संप्रेषण उपग्रह आहे जो ब्रॉडबँड कनेक्टिव्हिटी थेट सामान्य स्मार्टफोनवर आणण्यासाठी डिझाइन केलेला आहे. तो पृथ्वीवरील कुठूनही 4G आणि 5G व्हॉइस कॉल, व्हिडिओ कॉल, मेसेजिंग, स्ट्रीमिंग आणि डेटा सेवा सक्षम करेल.

प्रक्षेपणापूर्वी, ISRO चे अध्यक्ष व्ही. नारायणन यांनी २२ डिसेंबर रोजी तिरुमला येथील श्री व्यंकटेश्वर स्वामी मंदिरात पूजा केली. ISRO ने सांगितले की, LVM3 रॉकेटद्वारे लो अर्थ ऑर्बिट (LEO) मध्ये पाठवला जाणारा हा आतापर्यंतचा सर्वात जड पेलोड असेल. यापूर्वी, सर्वात जड पेलोड ४,४०० किलोग्रामचा होता, जो नोव्हेंबर २०२४ मध्ये GTO मध्ये प्रक्षेपित करण्यात आला होता.स्पेस एजन्सीनुसार, ४३.५ मीटर उंचीचे LVM3 रॉकेट तीन टप्प्यांचे आहे आणि त्यात क्रायोजेनिक इंजिन वापरले आहे. रॉकेटला लिफ्ट-ऑफसाठी दोन S200 सॉलिड बूस्टर थ्रस्ट देतात. प्रक्षेपणाच्या सुमारे १५ मिनिटांनंतर उपग्रह रॉकेटपासून वेगळा होण्याची अपेक्षा आहे.यापूर्वी, सर्वात जड LVM3-M5 कम्युनिकेशन उपग्रह ०३ होता, ज्याचे वजन सुमारे ४,४०० किलो होते, जो ISRO ने २ नोव्हेंबर रोजी जिओसिंक्रोनस ट्रान्सफर ऑर्बिट (GTO) मध्ये यशस्वीरित्या प्रक्षेपित केला होता.

# नवीन वर्षाच्या स्वागतासाठी शिर्डीत जय्यत तयारी

## ३१ डिसेंबरला रात्रभर सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४शिर्डी**

सरत्या २०२५ या वर्षाला निरोप देण्यासाठी तसंच येणाऱ्या नवीन २०२६ वर्षाच्या स्वागतासाठी शिर्डीचं साई मंदिर सज्ज झालं आहे. वर्षाच्या शेवटी दरवर्षी साईबाबांच्या दर्शनासाठी शिर्डीत मोठी गर्दी होते. यंदाही भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होणार आहे. अशा स्थितीत भाविकांच्या सुविधेसाठी साई संस्थानच्या वतीनं जय्यत तयारी करण्यात आली आहे. ३१ डिसेंबर रोजी साई समाधी मंदिर भाविकांना दर्शनासाठी रात्रभर खुलं ठेवण्यात येणार असल्याची माहिती संस्थानच्या वतीनं देण्यात आली आहे.



**८ दिवस शिर्डी महोत्सव**

२५ डिसेंबर २०२५ ते १ जानेवारी २०२६ या कालावधीत ८ दिवस शिर्डी साईबाबा संस्थानच्या वतीनं महोत्सव साजरा करण्यात येणार आहे. या निमित्तानं ३० डिसेंबर २०२५ ते १ जानेवारी २०२६ या तीन दिवसांत विविध सांस्कृतिक, धार्मिक कार्यक्रमांचं आयोजन साईबाबा संस्थानच्या वतीनं करण्यात आलं आहे, अशी माहिती संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी दिली.

**४६ हजार चौरस फुटांचा मंडप**

दरवर्षी नाताळ सुट्टी, सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी,नवीन वर्षाच्या स्वागतानिमित्त साईबाबांच्या दर्शनासाठी शिर्डीत मोठ्या प्रमाणात भाविक येत असतात. संस्थानकडे शिर्डी महोत्सवासाठी वेगवेगळ्या ठिकाणांहून येणाऱ्या ५३ पालख्यांची नोंदणी झालेली आहे. येणाऱ्या भाविकांची संभाव्य गर्दी लक्षात घेऊन मंदिर परिसरात तसंच, अतिरिक्त निवास व्यवस्थेसाठी साईधर्मशाळा व भक्त निवासस्थान इथं ४६ हजार चौरस फुटांचा मंडप उभारण्यात आला आहे.

**प्रसादासाठी विशेष व्यवस्था**

साईभक्तांसाठी सुमारे १२० क्विंटल साखरेचं मोफत बुंदी प्रसाद पॅकेट, तसंच, सुमारे ४०० क्विंटल साखरेचे मोतीचूर लाडू प्रसाद पॅकेट तयार करण्यात येणार आहेत. उत्सव कालावधीत भक्तांना प्रसाद लाडू पॅकेट सहज उपलब्ध व्हावेत, यासाठी नवीन दर्शन रांग, साईनाथ मंगल कार्यालय, द्वारकामाई समोरील खुलं नाट्यगृह, मारुती मंदिराशेजारी साई कॉम्प्लेक्स, गेट क्रमांक ४ च्या आतील बाजूस, साईप्रसादालय, सेवाधाम इमारत तसंच, सर्व निवासस्थानांमध्ये लाडू विक्री केंद्रं उभारण्यात आली आहेत. तसंच, आवश्यकता भासल्यास अतिरिक्त लाडू विक्री केंद्रं उभारण्याचं नियोजनही करण्यात आलं आहे.

# भाविकांना अध्यात्मासोबतच तीर्थस्थळी आल्याचे आत्मिक समाधान मिळावे-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## नाशिक जिल्ह्यातील मालसाणे णमोकार तीर्थ विकासासाठी ३६ कोटी ३५ लाख रकमेच्या आराखड्याला मान्यता



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४मुंबई**

नाशिक जिल्ह्यातील मालसाणे (ता. चांदवड) येथील जैन धर्मियांच्या णमोकार तीर्थ विकासासाठी ३६ कोटी ३५ लाख रकमेच्या आराखड्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित बैठकीत मान्यता देण्यात आली. या आराखड्यांतर्गत करण्यात येणाऱ्या कामांमुळे भाविकांना येथे आल्यानंतर अध्यात्मासोबतच तीर्थस्थळी येण्याचे आत्मिक समाधान मिळावे अशा पद्धतीने कामे पूर्ण करावीत,असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिले.

या ठिकाणी करण्यात येणारी कामे दर्जेदार असावी, कोणत्याही कामात तडजोड करण्यात येऊ नये. ही कामे विहित कालावधीत पूर्ण करण्याच्या सूचनाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिल्या.या ठिकाणी ६ ते २५ फेब्रुवारी २०२६ दरम्यान आंतरराष्ट्रीय पंचकल्याण प्रतिष्ठान महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या कामांमध्ये स्थायी स्वरूपातील २४ कोटी २६ लाख आणि महोत्सवाच्या आयोजनाकरिता १२ कोटी ९ लाख रुपयांच्या कामांचा समावेश आहे. बैठकीस वित्त व नियोजन राज्यमंत्री ड आशिष जयस्वाल, आमदार राहुल आहेर उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, णमोकार तीर्थ येथे येणाऱ्या भाविकाला कुठल्याही अडचणींचा सामना करावा लागू नये. संबंधित यंत्रणांनी सर्व सोयीसुविधा येथे भाविकांना उपलब्ध करून द्याव्यात. देश - विदेशातून येथे भाविक येणार असून येथे येणाऱ्या प्रत्येक भाविकाला या ठिकाणी येण्याचे समाधान मिळेल, अशा पद्धतीने महोत्सवाचे आयोजन करावे. महोत्सव आयोजनासाठी शासकीय यंत्रणांनी समन्वयाने काम करावे. स्वच्छतेसाठी असलेली कामे प्राधान्याने पूर्ण करावी. भाविकांची गैरसोय होणार नाही, याची काळजी घ्यावी. येथील पाणीपुरवठा योजनांची कामे पूर्ण करून पाणीपुरवठा नियमित करण्यात यावा, असे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.

या तीर्थाच्या विकासातून स्थानिक रोजगार निर्माण होणार आहे. त्या दृष्टीने विकास आराखडा राबविण्यात यावा. हे ठिकाण जैन धर्मियांचे राज्यातच नव्हे, तर देशात एक धार्मिक केंद्र म्हणून उदयास येईल. आंतरराष्ट्रीय पंचकल्याण प्रतिष्ठान महोत्सवासाठी देशभरातून १० ते १५ लाख भाविक येतील. हा सोहळा यशस्वी करण्याचे आवाहनही यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले.

बैठकीत नाशिकचे जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी दुरदृश्य प्रणालीद्वारे सादरीकरण केले. यावेळी अपर मुख्य सचिव (वित्त) ओ. पी गुप्ता, अपर मुख्य सचिव (सार्वजनिक बांधकाम) मनीषा म्हैसकर, सचिव (नियोजन) शैला ए, नाशिक विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम, जिल्हा नियोजन अधिकारी विजय शिंदे, णमोकार तीर्थचे पदाधिकारी उपस्थित होते.

## अमरावती महापालिका निवडणूक...

# दुसऱ्या दिवशी ७९४ अर्जाची उचल तर दोघांचा उमेदवारी अर्ज दाखल




**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४ अमरावती**

महानगरपालिकेच्या ८७ जागेसाठी १५ जानेवारीला मतदान होणार आहे. त्यापूर्वीची निवडणूक प्रक्रिया २३ डिसेंबरपासून नामांकन अर्ज उचल व दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होणार आहे. या निवडणुकीत ६ लाख ७७ हजार १८० मतदार आपल्या मतदानाचा हक्क बजावणार आहे. एकूण ७९७ मतदान केंद्र गठीत करण्यात आले आहे. महापालिका निवडणुकीकरीता ७ निवडणूक निर्णय अधिकार्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांचे ७ ठिकाणी वेगवेगळे कार्यालये आहेत.आज दुसऱ्या दिवशी एकूण ७९४ अर्जाची उचल करण्यात आली तर दोघांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. यात प्रभाग क्रमांक १६ ड मधून अब्दुल रफिक हे आहे.

**अशी झाली उमेदवारी अर्जाची उचल**

झोन क्रमांक १ - ९८ अर्ज
झोन क्रमांक २- ९६ अर्ज
झोन क्रमांक ३- १६१अर्ज
झोन क्रमांक ४- १३० अर्ज
झोन क्रमांक ५- १०२ अर्ज
झोन क्रमांक ६ - ४९ अर्ज
झोन क्रमांक ७- १५८ अर्ज
एकूण अर्ज ७९४

पहिले कार्यालय उत्तर झोन क्र.१ रामपुरी कॅम्प अंतर्गत प्रभाग क्र.१, २, ५, दुसरे कार्यालय नवीन तहसील येथे राहणार असून प्रभाग क्र.३, ४, ७, तिसरे कार्यालय मध्य झोन क्र.२ राजापेठ येथे प्रभाग क्र.११, १२, १८, चौथे कार्यालय पूर्व झोन क्र.३ दस्तुरनगर येथे प्रभाग क्र.८, ९, १०, पाचवे कार्यालय महानगरपालिका शिक्षण विभाग अंबापेठ येथे राहणार असून प्रभाग क्र. ६, १३, १७, सहावे कार्यालय पश्चिम झोन क्र.५ जुने तहसील येथे राहील, प्रभाग क्र. १४, १५, १६, सातवे कार्यालय दक्षिण झोन क्र. ४ बडनेरा येथे राहणार असून त्या अंतर्गत प्रभाग क्र.१९, २०, २१, २२ आहे. जे प्रभाग ज्या निवडणूक निर्णय अधिकार्याच्या कार्यालया अंतर्गत येतात तेथेच त्या प्रभागातल्या उमेदवारांना आजपासून अर्ज सादर करावा लागणार आहे. ३० डिसेंबरपर्यंत अर्ज स्विकारले जाणार आहेत.

२५ व २८ डिसेंबरला सुटी राहील. ३१ डिसेंबरला अर्जाची छाननी होईल. १ व २ जानेवारी अर्ज मागे घेण्याची मुदत आहे. ३ जानेवारीला उमेदवारांची अंतिम यादी व चिन्हाचे वाटप होऊन प्रचार सुरू होणार आहे. १३ जानेवारीच्या रात्री १० पर्यंत प्रचार करता येईल. उमेदवारला ९ लाख खर्च करण्याची मर्यादा आहे. १५ जानेवारीला मतदान व १६ जानेवारीला मतमोजणी होणार आहे. निवडणूक प्रक्रियेसाठी मनपाची यंत्रणा सज्ज झाली आहे. आदर्श आचारसंहीतेचे पालन काटेकोर व्हावे, यासाठी व अन्य कामासाठी विविध समिती गठीत करण्यात आल्या आहे.

## संपादकीय ......

# सत्ताधार्यांपासून वाचवा म्हणण्याची वेळ का आली?

*मराठी माणूस, मुंबई वाचवायची हे एकमेव लक्ष्य डोळ्यासमोर ठेवून ठाकरे बंधू महापालिका निवडणुकीत एकत्र आले आहेत. नगरपरिषद, नगरपंचायत निवडणुकीचा धुराळा खाली बसत नाही, तोच आता महापालिका निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली. ठाकरे बंधू एकत्र येणार येणार असे म्हटले जात होते, अखेर शिवसेना (ठाकरे) आणि मनसे युतीचा मुहूर्त ठरला. ठाकरे बंधूंनी एकत्र येण्याचे निश्चित केले. २० वर्षांची दरी या निवडणुकीच्या निमित्ताने किंवा सत्ताधारी भाजपमुळे मिटली असेही म्हटले तर वावगे ठरणार नाही. या दोन्ही सेना एकत्र येताना त्यांची एकवाक्यता 'मराठी माणूस' आणि 'मुंबई वाचवा' या शब्दांवरती झाली आहे. काँग्रेस त्यांच्यापासून दूर गेली असली तरी त्यांचाही नारा सत्ताधार्यांपासून धारावी, मुंबईतील मोक्याच्या जागा आणि मुंबईकरांना वाचवा हाच आहे. 'अच्छे दिन'चे स्वप्न दाखवून सत्तेत आलेल्या भाजपच्या १०-११ वर्षानंतरच्या काळानंतर आता जनतेला या सत्ताधार्यांपासून मराठी शाळा-जल-जंगल-जमीन आणि एकूणच माणसाला आवश्यक असणारी त्याची हक्काची जागा वाचवण्याची हाक का द्यावी लागत आहे.*

*मुंबईतीलच नाही तर राज्यातील मराठी शाळा वाचवण्याची हाक दिली जात आहे. एकीकडे मराठी भाषा अमृताहूनी गोड असे गोडवे गायचे आणि दुसरीकडे जिथे ही भाषा रुजेल, वाढेल, वृद्धिंगत होईल त्या शाळाच डम्प करायच्या. तिथे बुलडोजर फिरवून टॉवर उभे करायचे. आमची शाळा चोरीला गेली अशी तक्रार मुंबई पोलिसांत दाखल आहे. अजून किती गतीने मराठीची अवनती करायचा विचार आहे. कांजूर डम्पिंग ग्राऊंडच्या दुर्गंधीवर तोडगा काढण्याचे आदेश कोर्टाने सरकारला दिले आहेत. सर्वच गोष्टी या कोर्टाला का सांगाव्या लागत आहेत. कल्याणकारी राज्यामध्ये सत्ताधार्यांनी ज्यामध्ये जनतेचं कल्याण आहे तेच करणं अपेक्षित असताना त्यासाठी मोर्चे, आंदोलनं आणि नंतर न्यायालयाचे दार ठोठावून, कायद्याचा बडगा उगारून का सांगावं लागत आहे. नाशिकमध्ये झाडं वाचवा म्हणत अबालवृद्धांना 'चिपको आंदोलन' करावं लागलं. विकासाची कुर्हाड ही पहिली झाडावर पडते आणि नंतर बुलडोजर जंगल सपाट करून आता डोंगरही भुईसपाट करायला निघाले आहेत. जल-जंगल-जमीन वाचवण्याची लढाई ही फक्त आता आदिवासींची राहिलेली नाही. शुद्ध हवा-पाणी मिळण्याची धडपड आता राजधानी दिल्लीपासून रत्नागिरीतील लोटे परशुराम परिसरापर्यंतच्या नागरिकांना करावी लागत आहे. इटलीतील मिटेनी एस.पी.ए. ही रासायनिक कंपनी महाराष्ट्रातील रत्नागिरीत दाखल झाली आहे. अत्यंत घातक रसायनांचे उत्पादन या कंपनीमार्फत होते. हे केमिकल्स मानवी शरीर आणि निसर्गात दीर्घकाळ टिकून राहतात. यामुळे कॅन्सर, हार्मोनल आजार, वंध्यत्व यांसारखे गंभीर धोके वाढल्याचे स्पष्ट झाल्यानंतर इटलीतील न्यायालयाने कंपनीच्या ११ अधिकार्यांना १४१ वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावली. एवढी जीवघेणी कंपनी गुपचूप आपल्या महाराष्ट्रात रत्नागिरीत येते. यामुळे वशिष्ठी नदी, कोकणातील भूगर्भातील पाणी आणि आपल्या माणसांचं जीवन धोक्यात जाणार असल्याची आपल्याला कल्पनाही नसावी, हे किती भयानक आहे. याचे दुष्परिणाम दिसल्यावरच आम्ही कोकण वाचवा म्हणणार आहोत का?*

*आज दिल्ली वाचवा, हिमालय वाचवा अशी हाक दिली जात आहे. अरावली पर्वतरांगा नष्ट करण्याचे घाटत आहे. यामुळे फक्त राजस्थान, हरियाणा, दिल्लीचीच वाळू होणार नाही तर हिमालयापर्यंत वाळू उडून जाईल. हिमालयावर वाळूचे थर जमा झाले तर बर्फ मोठ्या प्रमाणात वितळून महापुराच्या चक्रात अडकलेल्या बिहारवर नेमके कोणते संकट येईल, हे सांगणेही कठीण आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे उत्तर भारताचं पर्यावरण संकटात आलं आहे. गुजरात, राजस्थान आणि हरियाणामधील अरावली पर्वतरांगांमध्ये खाणींसाठी कोर्टाने परवानगी दिली आणि हे संकट उभं राहिलं आहे. हजारो वर्षांपासून असलेल्या या पर्वतरांगांची व्याख्या करण्यात आली आणि तिथे खाणींना रान मोकळे करून देण्यात आले. यामुळे वन्यजीव, जलवायू संकट आणि उत्तर भारताचाच वाळवंट होण्याची प्रक्रिया सुरू होण्याची शक्यता आहे. त्यामुळे या संकटापासून वाचवा म्हणण्याची वेळ दिल्ली, राजस्थानसह एकूणच उत्तर भारतावर आली आहे. आरवली पर्वतरांगा जवळपास ६७० किलोमीटर लांब आहे. उत्तर भारताला त्यांनी थार वाळवंटापासून वाचवले आहे. सर्वोच्च न्यायालयाने खाण उद्योगांसाठी केलेल्या आरवलीच्या व्याख्येमुळे संपूर्ण आरवली पर्वतरांगा धोक्यात आल्या आहेत. जर आरवली पर्वतरांगा संपवून टाकण्यात आल्या तर मान्सून राजस्थानमध्ये न थांबता पूर्वेकडे जाईल. यामुळे राजस्थानमध्ये पर्जन्यमान कमी होईल. थर वाळवंट पूर्वेकडे सरकेल. डोंगररांगाच नसतील तर मान्सूनचे वारे न थांबताच पुढे निघून जातील. संपूर्ण उत्तर भारतात दुष्काळाची स्थिती निर्माण होईल. उत्तर भारताचे हवामानच बदलून जाईल. जंगल नष्ट झाले तर तिथले वन्यजीव, प्राणी, पक्षी कुठे जातील. या डोंगररांगांवर अवलंबून असलेले पर्यटन उद्योग, रोजगार आज आम्हाला वाचवा अशी हाक देत आहेत. सत्ताधार्यांच्या ११ वर्षांच्या कार्यकाळानंतर वाचवा-वाचवा हाक का द्यावी लागत आहे?*

# साहेब कॅलेंडर आले का? हो घरी

नवीन वर्षाची चाहूल लागली की, पहिल्यांदा वेध लागतात ते नवीन वर्षाच्या दिनदर्शिकेचे म्हणजेच कॅलेंडरचे. काही कॅलेंडरचे बँड तर दोन महिने आधीपासूनच जाहिराती करायला सुरुवात करतात. कॅलेंडरचा उद्देश दिवस, तारीख समजणे हा असला, तरी लोकांना संकष्टी चतुर्थी, एकादशी, शुभ दिवस, अमावस्या यांची पण माहिती पाहिजे असते. महानगरातील




आणि विशेषत: महापालिका परिसरात राहणाऱ्या लोकांना आता कॅलेंडरची चिंता राहिलेली नाही. घरोघरी कॅलेंडर वाटपाची झुंबड उडालेली आहे.

ज्यांचे पक्षाचे तिकीट निश्चित झाले आहे, त्या भावी नगरसेवकांनी आधीच तुमच्या घरामधील कॅलेंडरची जागा पटकवण्यास सुरुवात केलेली आहे. महिन्याच्या प्रत्येक पानावर एव्हानापर्यंत सदरील उमेदवाराने केलेली कामे यांचे फोटो लावलेले असतात. या उमेदवारांनी कुठून कुठपर्यंत रस्ता केला, कोणते नाले बांधले, नळाचे कनेक्शन कसे आणले याचा आवर्जून उल्लेख केलेला असतो. याशिवाय या उमेदवाराच्या पक्षाच्या राष्ट्रीय नेत्यांचे फोटोपण असतात.

साहेबांचा वाढदिवस कधी असतो, ते ठळक अक्षरांमध्ये त्या महिन्यात त्या तारखेला लिहिलेले असते. तिथे सोबत फोटो असतो. शिवाय आमचे प्रेरणास्थान, आमचे आधारस्तंभ, कार्यसमाट आमदार यांचे फोटो असतात. या सगळ्यांचा उद्देश कॅलेंडरच्या माध्यमातून थेट तुमच्या घरामध्ये आणि जमल्यास मनामध्ये जागा पटकावणे हा असतो. निवडणुका जवळ आल्यामुळे येते पंधरा-वीस दिवस तरी उमेदवाराची छबी तुमच्या घरात झळकत राहील आणि त्याच्या कामाकडे तुम्ही रोज पाहत राहिला, तर त्याला मतदान करण्याचा तुम्हाला मोह होईल, ही इच्छा असते. सध्या उमेदवार आणि कार्यकर्ते जथ्थ्याने तुमच्या घरी येऊन तुम्हाला कॅलेंडर देऊन आम्हालाच मतदान करा, असा आग्रह करतील.

अपक्ष किंवा बंडखोरी करणाऱ्या उमेदवारांचे कॅलेंडर पण तुमच्या घरी येत असतात; परंतु त्यावर पक्षाचे चिन्ह नसते. कारण, त्यांना कोण्या पक्षाने उमेदवारी दिलेली नसते. असे उमेदवार अपक्ष म्हणून उभे राहिले, तर कपबशी, क्रिकेटची बॅट, टीव्ही, पंख इत्यादी चिन्ह असते. तूर्त आपले नाव तुमच्यापर्यंत पोहोचावे एवढाच त्यांचा उद्देश असतो. बाकी एकदाचे चिन्ह मिळाले की, ते तुमच्या घरी येणारच असतात.

तूर्त मिळेल ते कॅलेंडर घेऊन ठेवा आणि ते घरात अडकून ठेवा एवढाच आमचा तुम्हाला सल्ला आहे. कोणी उमेदवार निवडून आला किंवा नाही आला, तरी तुम्हाला फरक पडत नाही. किमान तारीख, वार पाहण्यासाठी कॅलेंडर घरामध्ये असेल आणि ते तरी आपल्याला मिळाले, यावर खूश व्हायला हरकत नाही.

# आंबट गोड आवळे खाताना 'या' काही गोष्टींची घ्या काळजी

## डायटिशिअन सांगतात तरच मिळतील फायदे

**दि.२४विदर्भ प्रजासत्ताक**

वाढतं वजन आणि आजारांचा वाढता धोका यामुळे आजकाल लोक आपल्या आरोग्याबाबत फार जागरूक झाले आहेत. नॅचरल गोष्टींचा आहारात समावेश वाढवला आहे. यातीलच एक म्हणजे




आवळा. आवळ्याला आरोग्यासाठी सुपरफूड मानलं जातं. हेच कारण आहे की, अनेक हेल्थ एक्सपर्ट आवळे वेगवेगळ्या पद्धतीने आवळे खाण्याचा सल्ला देत असतात. पण आवळा खाताना काही गोष्टींची काळजी घेणं खूप महत्वाचं ठरतं. डायटिशिअन रंजनी रमन यांनी इन्स्टाग्राम हँडलवर एक व्हिडीओ शेअर केला आहे. ज्यात त्यांनी सांगितलं की, कोणत्या गोष्टींची काळजी घेऊन आवळे खाल्ले तर आपल्याला फायदे मिळू शकतील.

**किती प्रमाणात खावे?**

डायटिशिअन सांगतात की, अनेक फायदे मिळतात म्हणून बरेच लोक जास्त प्रमाणात आवळे खातात. पण जास्त आवळे खाऊन फायदे मिळत नाही. उलट नुकसान होऊ शकतं. रोज अर्धा किंवा एक ताजा आवळा खाणं पुरेसं असतं. जर आवळ्याची पावडर वापरत असाल तर अर्धा चमचा पुरेशी आहे. जास्त प्रमाणात खाल तर काही लोकांच्या पोटात जळजळ किंवा गॅसची समस्या होऊ शकते.

**आवळा खाण्याची योग्य वेळ**

आवळे खाण्यासाठी चांगली वेळ जेवणासोबत किंवा जेवण केल्यानंतरची मानली जाते. यातील पोषक तत्व या वेळेत अधिक ॲब्जॉर्ब होतात. तसेच बरेच




लोक उपाशीपोटी आवळे खाणं चांगलं मानतात. पण असं केल्यास काही लोकांना ॲसिडिटी किंवा जुलाब लागण्याची भीती असते. त्यामुळे उपाशीपोटी आवळा खाणं टाळलं पाहिजे.

**रोज खावेत का आवळे?**

**डायटिशिअन सांगतात की, आठवड्यातून ३ ते ४ वेळा आवळे खाणं आरोग्यासाठी चांगलं असतं.**

**आवळे खाण्याची योग्य पद्धत**

आपण आवळे वेगवेगळ्या पद्धतीने खाऊ शकतो. आपण कच्चे ताजे आवळे थेट खाऊ शकतो. हलके शिजवून खाऊ शकतो किंवा चटणी खाऊ शकतो. पावडरचा वापर करू शकतो किंवा आवळ्याचा ज्यूस पिऊ शकतो. कच्चे आवळे नेहमी थोडं मीठ लावूनच खाल्ले पाहिजेत. आयुर्वेदात एकूण ६ रस आहेत. आवळ्यामध्ये खारट सोडून सगळे रस असतात. त्यामुळे मिठासोबत त्याचं सेवन करावं. मिठासोबत याचं सेवन करून तो संपूर्ण बनतो आणि त्याचा आंबटपणाही बॅलन्स होतो. तसेच आवळ्यात फायदेही अधिक वाढतात.

**कोणत्या लोकांनी काळजी घ्यावी?**

ज्या लोकांना नेहमीच ॲसिडिटी किंवा पोटासंबंधी गंभीर समस्या असते किंवा जे लोक एखाद्या आजाराची औषधं नियमित घेत असतील त्यांनी आवळे खाण्याआधी डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

# पीक पाहणी पवर दोन मिनिटांत करा बांधावरील झाडांची नोंद, अशी आहे सोपी पद्धत!

**दि.२४विदर्भ प्रजासत्ताक**

ई-पीक पाहणी ऑनलाईन नोंदणी ही महाराष्ट्र शासनाने शेतकऱ्यांसाठी सुरू केलेली एक डिजिटल सुविधा आहे. या माध्यमातून शेतकरी स्वतःच्या शेतातील पिकांच्या माहितीची ऑनलाईन पद्धतीने नोंदणी करू शकतात. जशी पिकांची पाहणी करून नोंद केली जाते, तशीच बांधावरील झाडांची देखील या प मध्ये नोंद करता येते.




**तर बांधावरील झाडांची नोंदणीची प्रक्रिया पाहुयात...**




सर्वप्रथम Google Play Store वर जाऊन E-Pik Pahani ई-पीक पाहणी हे प Install करा.

n Install झाल्यावर तो जशिप करायचा आहे.

मोबाईलमधील access साठी झशीाळींीळेप मागितली जाईल, त्यासाठी allow वर क्लिक करा.

आता तुमच्यासमोर एक नवीन पेज उघडेल, त्यामध्ये तुम्हाला तुमचा विभाग निवडायचा आहे.

पुढे जाऊन लॉग इन करा. यासाठी मोबाईल नंबर आवश्यक राहील.

यानंतर तुमचा जिल्हा, तालुका व गावाची निवड करायची आहे.

पुढे एक नवीन पेज उघडेल. त्यामध्ये तुम्हाला तुमचे खाते शोधायचे आहे. तुमचे पहिले नाव, मधले नाव, आडनाव, खाते क्रमांक, गट क्रमांक टाकून खाते शोधू शकता. तुम्ही निवडलेल्या पर्यायानुसार माहिती भरा आणि Search या बटनावर क्लिक करा. यानंतर बांधावरील झाडांची नोंदणीसाठी प्रक्रिया सुरु होईल.

यासाठी खाते क्रमांक, गट क्रमांक, बांधावरील झाडे, झाडांची संख्या आदी माहिती भरावी.

आता तुमची माहिती अपलोड झाल्याचा एक मेसेज दिसेल.

अशा पद्धतीने तुम्ही तुमच्या शेतातील बांधावरील झाडांची नोंद करता येईल.

# निवृत्ती वेतन प्रस्ताव आता दोन वर्ष आधीच तयार होणार

## जिल्हा परिषद शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी नवी कार्यपद्धती

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४अमरावती-** जिल्हा परिषदेच्या सेवेतून निवृत्त होणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी अमरावती जिल्हा परिषदेने नवी कार्यपद्धती (डजझ) तयार केली आहे. यानुसार, कर्मचाऱ्यांच्या निवृत्ती वेतन प्रस्तावाची तयारी आता त्यांच्या सेवानिवृत्तीच्या दोन वर्षांपूर्वीच सुरू केली जाईल.




महाराष्ट्र नागरी सेवा १९८२ च्या तरतुदींनुसार हे पाऊल उचलण्यात आले आहे. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) संजीता महापात्र यांनी संबंधित विभागांना यासंदर्भात विशेष निर्देश दिले आहेत.

राज्य शासनाने यासाठी काही टप्पे निश्चित केले आहेत. सेवानिवृत्तीला दोन वर्षांचा कालावधी शिल्लक असतानाच संबंधित कर्मचाऱ्यांचे सेवापुस्तक अद्ययावत करण्याची प्रक्रिया सुरू केली जाईल. यामध्ये कर्मचाऱ्याला मिळालेल्या पदोन्नती, बढत्या आणि पुरस्कारांची नोंद योग्य प्रकारे झाली आहे की नाही, याची खात्री केली जाईल. ही जबाबदारी संबंधित कर्मचारी ज्या संस्था किंवा शाळेत कार्यरत आहे, त्या विभागप्रमुखाची असेल. गटशिक्षणाधिकाऱ्यांद्वारे या सर्व बाबी पूर्ण केल्या जातील.मृत कर्मचाऱ्यांच्या बाबतीत ही प्रक्रिया अधिक वेगाने पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. यासाठी केवळ १५ दिवसांचा कालावधी निश्चित करण्यात आला आहे. या कालावधीत संपूर्ण प्रस्ताव तयार करून कुटुंब निवृत्तीवेतनासाठीची प्रक्रिया पूर्ण केली जावी, असे शासनाचे म्हणणे आहे.

प्रस्ताव तयार करण्यात यंत्रणेकडून विलंब झाल्यास व्याजाची तरतूद करण्यात आली आहे. निवृत्ती वेतनाचा प्रस्ताव तयार करण्यास उशीर झाल्यास संबंधित कर्मचारी व्याजाची मागणी करू शकतो. या व्याज देयकाची संपूर्ण जबाबदारी संबंधित पंचायत समितीमधील शिक्षण विभागाचे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर निश्चित करण्यात आली आहे. यामुळे विलंब टाळण्यासाठी संबंधित कर्मचाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे.

# १ जानेवारी २०२६ पासून शेतकऱ्यांसाठी व इतर क्षेत्रांसाठी होणार 'हे' महत्त्वाचे बदल; वाचा सविस्तर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४अमरावती**

२०२५ वर्ष संपत असताना नववर्षासोबत केवळ नवीन कॅलेंडरच नव्हे, तर अनेक महत्त्वाचे नियम बदल लागू होणार आहेत.

१ जानेवारी २०२६ पासून बँकिंग, वेतन, सोशल मीडिया, इंधन दर आणि सरकारी योजनांमध्ये मोठे बदल अपेक्षित आहेत.

**आमच्या न्यूजलेटरसाठी साईन-अप करा**

Email -ddress

याचा थेट परिणाम शेतकरी, नोकरदार, युतक आणि सर्वसामान्य नागरिकांवर होणार आहे. १६ वर्षांखालील मुलांसाठी सोशल मीडियावर वयोमर्यादा व पालक नियंत्रण लागू करण्याचा विचार सुरू आहे.

## बँकिंग नियम

क्रेडिट स्कोअर १५ दिवसांऐवजी दर आठवड्याला अपडेट केला जाईल. त्यामुळे कर्जदारांचा आर्थिक इतिहास अधिक अचूक दिसणार आहे.

पॅन-आधार लिंक करणे १ जानेवारीपासून अनिवार्य असेल. लिंक न केल्यास बँकिंग व सरकारी सेवा बंद होऊ शकतात.

## सामान्यांसाठी बदल काय?

नवे आयटीआर फॉर्म येण्याची शक्यता असून त्यात व्यवहार आधीच भरलेले असतील.

## इंधन दर बदलू शकतात.

## या सुविधा महाग

क्रेडिट कार्डद्वारे गेमिंग प्लॅटफॉर्मवर होणाऱ्या व्यवहारांवर २ टक्के शुल्क आकारले जाईल.

## डिजिटल पेमेंट्ससाठी नियम कडक होतील.

पेटीएम, ॲमेझॉन, मोबिक्विक यांसारख्या थर्ड पार्टी




ॲप्सवर ५ हजार रुपयांपेक्षा जास्त रक्कम पाठविल्यास १ टक्का शुल्क लागेल

सरकारी कर्मचाऱ्यांची चांदी ८ वा वेतन आयोग १ जानेवारी पासून लागू होण्याची शक्यता आहे.

महागाई भत्ता (डीए) वाढण्याची अपेक्षा असून केंद्रासह काही राज्यांतही किमान वेतनात वाढ होऊ शकते.

## शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचे बदल

पीएम-किसान योजनेसाठी फार्मर युनिक आयडी बंधनकारक केला जाईल.

पीक विमा योजनेत वन्य प्राण्यांमुळे झालेल्या नुकसानीची भरपाई मिळेल.

क्रेडिट कार्डवरील सुविधा कमी होणार

आयसीआयसीआय बँकेच्या इन्स्टंट प्लॅटिनम कार्डवर 'बुक माय शो'द्वारे मिळणाऱ्या मोफत चित्रपट तिकिटांचा लाभ १ फेब्रुवारी २०२६ पासून बंद होणार आहे.

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

# विदर्भ प्रजासत्ताक

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

बुधवार दि. २४ डिसेंबर २०२५

शहर/ग्रामिण

# दोन हजार क्विंटल रेशन धान्याची अफरातफर

## अमरावतीतील महिला निरीक्षण अधिकाऱ्याला नोटीस

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४अमरावती :** रेशन दुकानदारांच्या संगनमताने नियतनापेक्षा सुमारे दोन हजार क्विंटल अधिक रेशन धान्य मंजूर करून त्याची अफरातफर केल्याचा गंभीर प्रकार अमरावती तहसील ग्रामीणमध्ये उघडकीस आला आहे. या प्रकरणी संबंधित महिला निरीक्षण अधिकारी चैताली यादव यांना जिल्हा प्रशासनाने नोटीस बजावली आहे.पुरवठा विभागाकडून लाभार्थी संख्या व प्रवर्गानुसार रेशन दुकानदारांना धान्याचे वितरण केले जाते. मात्र माहुली जहांगीर व औरंगपूर येथील रेशन दुकानदारांना मंजूर नियतन यादी व गोदाम नोंदवहीमध्ये मोठी तफावत आढळून आली. जिल्हा पुरवठा अधिकारी निनाद लांडे यांनी ही बाब गंभीरतेने घेत एईपीडीएस पोर्टलवरील माहिती व की रजिस्टरच्या आधारे पडताळणी केली असता अतिरिक्त धान्य मंजुरीचा घोळ निदर्शनास आला.



तपासणीत अंत्योदय व प्राधान्य प्रवर्गातील रेशन दुकानदारांना मंजूर प्रमाणापेक्षा जास्त प्रमाणात गहू व तांदूळ वितरित झाल्याचे स्पष्ट झाले. या प्रकरणाच्या चौकशीसाठी एडीएसओ प्रज्वल पाथरे यांच्या नेतृत्वाखाली पथक गठित करण्यात आले. पथकाच्या तपासणीत निरीक्षण अधिकारी चैताली यादव यांच्याकडून दुकाननिहाय धान्य नियतनात मोठ्या प्रमाणावर अनियमितता झाल्याचे निष्पन्न झाले.ही बाब जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या निदर्शनास आणल्यानंतर त्यांच्या मान्यतेने २३ डिसेंबर रोजी संबंधित निरीक्षण अधिकाऱ्यास नोटीस बजावण्यात आली आहे. जानेवारी ते डिसेंबर २०२५ या कालावधीत ठराविक रेशन दुकानदारांना देय नियतनापेक्षा जास्त धान्य मंजूर केल्याबाबत समक्ष उपस्थित राहून प्रमाणित कागदपत्रांसह लेखी खुलासा सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

# चिल्लर नाणे देत उचलला नामांकन अर्ज



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४अमरावती** अमरावती महानगरपालिका निवडणुकीच्या नामांकन अर्ज उचलण्याच्या प्रक्रियेला सुरुवात झाली. पहिल्याच दिवशी राजापेठ झोनमधून विवेकानंद प्रभाग क्रमांक १२ येथून ओपन पुरुष गटासाठी समर्थकांसह नामांकन अर्ज उचलण्यात आला.

तसेच खुल्या प्रवर्गातील महिला उमेदवार म्हणून सौ. ज्योती सुभाष श्रीखंडे यांच्यासाठीही नामांकन अर्ज घेण्यात आला.नामांकन अर्ज उचलताना आवश्यक नामांकन शुल्क कॉईनच्या स्वरूपात भरपाई करण्यात आली. ही रक्कम अधिकृत निवडणूक अधिकाऱ्यांनी स्वीकारली. नामांकन प्रक्रियेच्या पहिल्याच दिवशी उमेदवार व समर्थकांमध्ये उत्साहाचे वातावरण दिसून आले असून आगामी मनपा निवडणुकीसाठी राजकीय हालचालींना वेग आला आहे.

# जिल्ह्यात रब्बीची ९३ टक्के पेरणी आटोपली

## तुर, कापसाने अतिरिक्त ९ हजार हेक्टर क्षेत्र व्यापले

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४अमरावती** : यंदा रब्बीत तुरीच्या लागवडीत २.३३९.८७ तर कापसाच्या ७ हजार ८१ हेक्टरने वाढ झाल्याचा दिलासा व्यक्त होत असतान काही भागात हरभरावर अल्प प्रमाणात मर चा प्रादुर्भाव वाढल्याने नुकसानीची भीती देखील व्यक्त होत आहे. जिल्ह्यात आतापर्यंत १ लाख ४४ हजार १०० हेक्टरवर रब्बीची पेरणी आटोपली आहे. याची टक्केवारी ९३ टक्के इतकी आहे. यंदा कापसाच्या उत्पादनात ४० टक्के घटण्याची शक्यता देखील कृषी विभागाने वर्तविली आहे.

जिल्ह्यात सप्टेंबर अखेर सरासरी ८६२.०० मि.मी. पावसाच्यातुलनेत ७५७.३० मि.मी. म्हणजेच ८७.८५ टक्के पाऊस झालेला आहे. त्यामुळे रब्बीचे पिक सद्यातरी चांगल्या स्थितीत असल्याचा अहवाल शासनाकडे सादर करण्यात आला आहे. यामध्ये तूर पिकाचे सरासरी क्षेत्र १,११,३४० हेक्टर असून सध्या १,२०,२३६.२७ हेक्टर क्षेत्रावर पेरणी झालेली आहे. मागील वर्षाच्या तुलनेत २,३३९.८७हेक्टरने वाढ झाली आहे. तूर पीक सध्या फुलोरा ते शेंगा धरण्याच्या अवस्थेत आहे. कापूस पिकाचे सरासरी क्षेत्र २,६८, ४७१ हेक्टर असून सध्या २,४३,७२९.०७हेक्टरवर पेरणी झालेली आहे. मागील वर्षाच्या



तुलनेत ७,०८१.६७ हेक्टरने वाढ नोंदविण्यात आली आहे. जिल्ह्यात कापसाची चौथी वेचणी सुरू असून, कापूस पिकाच्या उत्पादकतेत सुमारे ४० टक्के घट येण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. हरभरा पिकाचे सरासरी क्षेत्र १,०९,४०६.३३ हेक्टर असून सध्या ९२,१०५ हेक्टरवर पेरणी झालेली आहे. पीक उगवण ते रोपावस्थेत असून पेरणी सुरू आहे. काही ठिकाणी मर रोगाचा अल्प प्रमाणात प्रादुर्भाव आढळून आला आहे. गहू पिकाचे सरासरी क्षेत्र ४१,४३४.८४ हेक्टर असून सध्या ४३,२२०.९० हेक्टरवर पेरणी पूर्ण झाली आहे. पीक उगवण अवस्थेत असून पेरणी प्रक्रिया सुरू आहे. दरम्यान, दर्यापूर तालुक्यात खरीप हंगाममध्ये कपाशीखालील क्षेत्र सरासरीपेक्षा अधिक झाल्याने तसेच सोयाबीन क्षेत्रात घट झाल्यामुळे रब्बी हंगामात हरभरा पिकाखालील क्षेत्रात घंट झाल्याचे निदर्शनास आले आहे.

## शालार्थ आयडी प्रकरणातील मोठी कारवाई

# यवतमाळचे शिक्षणाधिकारी रवींद्र काटोलकर यांना अटक

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४यवतमाळ** 'शालार्थ आयडी' घोटाळ्यात पोलिसांनी आणखी एक मोठी कारवाई करतयवतमाळ येतील शिक्षणाधिकारी रविद्र काटोलकर यांना अटक केली आहे. नागपुरात प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाधिकारी असताना त्यांनी बोगस शालार्थ आयडी तयार केल्याचा त्यांच्यावर ठपका आहे, त्यांना वर्धा येथून अटक करण्यात आली असून हे प्रकरण थंडबस्त्यात गेल्याची चर्चा करणाऱ्या शिक्षण विभागात खळबळ उडाली आहे. सायबर



पोलीस ठाण्याच्या पथकाने ही कारवाई केली. ऑनलाईनशालार्थ आयडी प्रणालीचा गैरवापर करून अनेक शाळांमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती करण्यात आलीहोती. याप्रकरणात विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयातील कनिष्ठ प्रशासन अधिकारी रविद्र ज्ञानेश्वर पाटील यांच्या तक्रारीवरून सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. याचा तपास राज्यपातळीवरील विशेष तपास पथकाकडून सुरू आहे. या प्रकरणात यवतमाळचे शिक्षणाधिकारी रविद्र काटोलकर यांची सुरुवातीला चौकशी देखील झाली होती व त्यांना अटकपूर्व जामीन देखील मिळाला होता. काटोलकर हे अगोदर भंडारा येथे कार्यरत होते.

# मनपा निवडणूक आचारसंहितेमुळेचोख व्यवस्था

## नवीन फिक्स पॉईटसह ३१ डिसेंबरला बंदोबस्त

**रोडवर हुडदंग माजविणाऱ्यांची खैर नाही**

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४अमरावती** एका आठवड्याने नवीन वर्षात आपण प्रवेश करू. तत्पूर्वी ३१ डिसेंबर रोजी शहरात नवीन वर्षाचे मोठ्या उत्साहात स्वागत केले जाते. लोक अनेकदा मित्रमैत्रिणी आणि कुटुंबासह बाहेर फिरायला निघतात. मात्र आता आगामी महानगरपालिका निवडणुकीसाठी आचारसंहिता लागू असल्याने, मंगळवार, ३१ डिसेंबरच्या रात्री कडक पोलिस बंदोबस्त लावण्यात येणार आहे. विशेषतः २५ डिसेंबरनंतर, शहरात नवीनफिक्स पॉईंट लावण्यात येणार असून अतिरिक्त सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात येईल. विशेषतः वाहतूक विभागाच्या कर्मचाऱ्यांसह अनेक ठिकाणी नाकाबंदी करण्यात येईल. तसेच ड्रंक अँड ड्राईव्ह मोहिम राबविण्यात येईल. रस्त्यावर गैरप्रकार करणाऱ्यास प्रतिबंधात्मक कारवाईला सामोरे जावे लागेल, अशीमाहिती पोलिस आयुक्त राकेश ओला यांनी क दिली.

**अटक केलेल्यांची कुंडली शोधणे सुरु**



शुक्रवारी रात्री शहरात हंगामा करणाऱ्या एकूण २१ जणांना अटक करण्यात आली आहे. याशिवाय, मंथन हत्याकांडात ११ आरोपींना अटक करण्यात आली आहे. दोन्ही प्रकरणांमध्ये सुमारे ३२ आरोपी ताब्यात आहेत. या अटक केलेल्या आरोपींचे रेकॉर्ड तपासले जात आहेत आणि येत्या काळात पोलिस विभाग निश्चितच त्यांच्यावर माहिती पोलिस आयुक्त राकेश ओला यांनी दिली.

**अटक केलेल्यांची कुंडली शोधणे सुरु**

### आता, केवळ कारवाईचा धडाका

गेल्या काही दिवसांपासून गुन्हे शाखा सतत कारवाई करत आहे, तर संबंधित पोलिस ठाण्यांचे डीबी पथके मात्र बघ्याची भूमिका घेतल्यासारखे दिसत आहे. परिणामी, पोलिस आयुक्तांनी काही पोलिसठाण्यांच्या संबंधित पथकांना विशिष्ट कारवाई करण्याचे कडक निर्देश दिले आहेत. अशा परिस्थितीत, आगामी निवड णुकांसाठी पोलिस कर्मचाऱ्यांच्या मार्गद र्शनाखाली विशेष कारवाई सुरू केली जाऊ शकते. सीपी राकेश ओला यांनी सांगितले की, येत्या काही दिवसांत पोलिस आयु क्तालयात कारवाईचा धडाका सुरु होईल.

### सर्व पोलिस स्टेशन क्षेत्रात कारवाई सुरू

महापालिका निवडणुकीसंदर्भात आधीच बैठक झाली आहे. बुधवारी संबंधित अधिकाऱ्यासोबत बैठक होणार आहे. त्यानंतर, शहरातील सीमावर्ती ठिकाणे आणिविशेषतः संवेदनशील क्षेत्रांसह विविध मुद्द्यांवर चर्चा करून व्यवस्थेची प्रक्रिया सुरू होईल. निवडणुकीसाठी किती अतिरिक्त पोलिस तैनात करावे लागणार, याचे मूल्यांकन केल्यानंतर पुढील कारवाई केली जाईल. सर्व पोलिस स्टेशन क्षेत्रातप्रतिबंधात्मक आणिइतर उपाययोजना सुरू करण्यात आल्या आहेत.

शुक्रवारी रात्री शहरात हंगामा करणाऱ्या एकूण २१ जणांना अटक करण्यात आली आहे. याशिवाय, मंथन हत्याकांडात ११ आरोपींना अटक करण्यात आली आहे.दोन्ही प्रकरणांमध्ये सुमारे ३२ आरोपी ताब्यात आहेत. या अटक केलेल्या आरोपींचे रेकॉर्ड तपासले जात आहेत आणि येत्या काळात पोलिस विभाग निश्चितच त्यांच्यावर कठोर कारवाई करेल. पोलिस आयुक्त ओला यांनी सांगितले की, खून प्रकरणातील आरोपींची संख्या वाढू शकते आणि पोलिस त्यांचा शोध घेत आहेत. कोणत्याही परिस्थितीत कोणालाही सोडले जाणार नाही.

# आरोपीच्या मोठ्या भावाची फेसबुकवर लाईव्ह धमकी

## सोशल मीडियावर गुंडगिरीची नवीन फंडा

### बडनेरा पोलिस स्टेशनमध्ये तक्रार दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४बडनेरा** बडनेरातील ऋषी खापेकर हत्याकांडातील सर्व आरोपींना पोलिसांनी अटक करण्यात आली आहे. मात्र एका आरोपीचा भाऊ अजून खुलेआम दहशत पसरवत आहे. खून प्रकरणात अटक केलेल्या आरोपीचा भाऊ सलमान याने ऋषीसारखा घरात घुसून गेम करणार... अशी जीवे मारण्याची धमकी एका गरीब तरुणाला दिल्याने खळबळ उडाली आहे.

माहितीनुसार, सलमान नावाच्या एका व्यक्तीने सोशल मीडियावर व्हिडिओद्वारे आशिष शरद देशमुख नावाच्या तरुणाला धमकी दिली. आशिष देशमुखवर त्रऋषी खापेकर यांना मदत केल्याचाआरोप आहे. वहाब शाहने व्हिडिओ बनवून उघडपणे जीवे मारण्याची धमकी दिल्याने परिसरात भीतीचे वातावरणनिर्माणझाले. यागंभीर प्रकाराची दखल घेत संबंधित परीसरातील रहिवासी आणि भाजप पदाधिकारी शिवराय कुलकर्णी यांनी मंगळवारी बडनेरा पोलिस ठाण्यात पोलिस अधिकाऱ्यांची भेट घेऊन आरोपींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली. कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी आणि जनतेची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी अशा व्यक्तींकडूननिर्माणहोणारी दहशततात्काळ संपवली पाहिजे, असे त्यांनी सांगितले. या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेत बडनेरा पोलिसांनी तक्रार नोंदवून चौकशी सुरू केली.-

# फसवणूक केलेले १९ लाख बँक कर्मचाऱ्याला परत

## २४ लाखांच्या सायबर फसवणुकीचे मोठे प्रकरण

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४अमरावती-** ,बँक कर्मचारी असल्याचे भासवून २४ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा गंभीर प्रकार शहरातील सायबर पोलिस ठाण्यात नोंदवण्यात आला. सायबर सेलने तात्काळ या प्रकरणी वेगाने तपासचक्रे फिरवित ऑनलाइन फसवणुकीतून १९ लाख रुपये वसूल केले आणि ते बँकेत सुरक्षितपणे परत केले. सायबर सेल या प्रकरणातील आरोपीचा शोध घेत आहे.

माहितीनुसार, तक्रारदार, जोएक बैंक कर्मचारी आहे, त्याला एका अज्ञात मोबाइल नंबरवरून चालू खातेधारकाच्या नावाने कॉल आला. खातेधारक असल्याचा दावा करणाऱ्या कॉलरने म्युच्युअल फंडमध्ये २ कोटी रुपये गुंतवण्याची ऑफर दिली. काही वेळातच, त्याच व्यक्तीने पुन्हा फोन केला आणि सांगितले की त्याचे चेकबुक कालबाह्य झाले आहे आणि त्याला ताबडतोब दुसऱ्या बँक खात्यात पैसे ट्रान्सफर करायचे आहेत. कॉलरने कंपनीच्या लेटरहेडवर एक पत्र पाठवले ज्यामध्ये प्रदान केलेल्या खात्यात आरटीजीएस करण्याची विनंती केली होती. खातेदार हा दीर्घकाळापासून विश्वासू ग्राहक असल्याने, बँक कर्मचाऱ्याने फोनवरून मिळालेल्या माहितीच्या आधारे आरटीजीएस ट्रान्सफरची प्रक्रिया केली. त्यानंतर काही वेळातच, खातेदाराने बँक व्यवस्थापकाला फोन केला की कोणताही व्यवहार केला नसताना त्याच्या खात्यातून २४.९८ लाखट्रान्सफर झाले. ज्या मोबाईल नंबरवरून कॉल आला तो नंबर खात्यात नोंदणीकृत नव्हता. अशा प्रकारे, खातेदार असल्याचे भासवून एका अज्ञात व्यक्तीने बँकेची २४.९८ लाख रुपयांची फसवणूक केली.

**सायबर सेल पोलिसांची कारवाई**

२४.९८ लाख तात्काळ घटनेचे गांभीर्यलक्षात घेऊन, बँकेने तात्काळ अमरावती शहरातील सायबर पोलिस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली. पोर्टलवर तात्काळ तक्रार नोंदवून तपास सुरू करण्यात आला. तपासादरम्यान, फसवणुकीच्या रकमेपैकी १९ लाख रुपये वादग्रस्त बँक खात्यात ट्रान्सफर करण्यात आल्याचे आढळून आले. सायबर पोलिसांनी तातडीने कारवाई केली आणि संबंधित बँकेशी पत्रव्यवहार करून तात्काळ रक्कम गोठवली. नंतर, आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर, गोठवलेली १९ लाखांची रक्कम मूळ खातेदाराला परत करण्यात आली. ही कारवाई पोलिस आयुक्त राकेश ओला, पोलिस निरीक्षक महेंद्र अंभोरे यांनी केली. एपीआय अनिकेत कासार, प्रियांका कोटावार, निखिल माहुरे, जितेंद्र थोरात, ममता अनुक, अपर्णा बंडे, महेश वाघमारे, नरेंद्र उघाडे, विशाल यादव, अश्विन यादव, रोशन लकडे, नीलेश वानखडे, करण बोरकुटे, सपना साखरे, स्वप्निका बावळे, स्वप्निका बव्वा, ए. वानखडे, मोहम्मद सुलतान यांची प्रमुख भूमिका होती.

# गव्हाच्या पेरणीसाठी कपाशी काढली; पण धरणाचे पाणी मिळेना

## शिरजगावच्या शेतकऱ्यांचे रब्बीची पेरणी लांबलीएक महिना होऊनही धरणाच्या कॅनलचे बांध नादुरुस्तच

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४ शिरजगाव मोझरी** : खरिपाचे पिक अतिवृष्टीने वाहून गेले. अद्याप नुकसान भरपाई, रब्बीच्या पेरणीसाठी अनुदान सुद्धा सरकारकडून मिळाले नाही. अशा परिस्थितीत हिरवेगार बोंड असलेले कपाशीचे पीक काढून दहेगाव धरणाच्या पाण्यावर गव्हाचे पिक घेण्याच्या प्रतिक्षेत असलेले शेतकरी पुन्हा अडचणीत सापडले आहे. प्रचलित परंपरेप्रमाणे ८ ते १५ डिसेंबरच्या दरम्यान धरणाच्या पाण्याचा पहिल्या टप्प्यात शेतकऱ्यांच्या गव्हाची लागवड होते. मात्र, यावेळी २३ डिसेंबर येऊनही कॅनलचे बांधच दुरुस्त झाले नसल्याने शेतकऱ्यांच्या रब्बीच्या पेरणी लांबली आहे.

दहेगाव धरणावरून तब्बल १५ गेटने पाणी सोडून सुमारे ६० पेक्षा अधिक शेतकऱ्यांची जमीन दरवर्षी ओलीताखाली येते. याच पाण्यावर शेतकरी रब्बीच्या हंगामात गव्हाचे उत्पन्न घेते. मात्र, यावेळी मृद्जलसंधारण विभागाच्या निष्काळजीपणामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. कॅनलचे बांध सुद्धा फुटले आहे. तर गेल्या पावसाळ्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे अनेकठिकाणी गेट फुटून शेतकऱ्यांच्या शेतात पाणी घुसले होते. अशा दुरुस्तीचे काम



यावेळी रब्बी पिक पेरणीच्या आधी होणे गरजेचे होते. मात्र दुरुस्तीची कामे उशिरा लागल्याने आता, गव्हाच्या पेरणीसाठी शेत तयार करून पाण्याच्या प्रतीक्षेत असलेला शेतकरी विवंचनेत सापडला आहे. शिरजगाव मोझरीतील शेतकऱ्यांना याचा सर्वाधिक फटका बसला असून, दहेगाव धरणाच्या बांधावर जाऊन संबंधित काम करणाऱ्या कंत्राटदाराला यासंबंधीत सामाजिक कार्यकर्ते यांनी जाब विचारला असून, बुधवारी संध्याकाळ पर्यंत दुरुस्तीचे कामे पूर्ण करून गुरुवारी सकाळ पासून पाणी सोडण्यात यावे अशी मागणी मृद्जलसंधारणाच्या कार्यकारी अभियंता निकिता देशमुख यांच्याकडे केली आहे. त्यावरून गुरुवारी पाणी सोडण्याचे आश्वासन त्यांनी दिले असून, तातडीने दहेगाव धरणाची पाहणी दौरा करण्यार असेही देशमुख म्हणाल्या आहे. उशिरा रब्बीच्या पिक पेरणीमुळे शेतकऱ्यांच्या गव्हाच्या उत्पादनावर परिणाम होतो. एकरी उत्पादन जास्त होण्या येवजी उत्पन्न घटते. त्यामुळे शेतीत गव्हासाठी लागलेली लागत सुद्धा हाती येत नसल्याचे शिरजगाव मोझरीचे शेतकरी प्रमोद मेश्राम यांनी सांगितले.

कॅनलचे बांध अनेक ठिकाणी फुटले आहे. थातुरमातुर कामे केली जात आहे. अनेक ठिकाणी बांधाचे खोलीकरण झाले नाही. तर कचऱ्याचे ढिगारे सुद्धा बांधांमध्ये दिसून येते. त्यामुळे धरणाचे पाणी सोडले तरी ते पाणी आमच्या शेतात न पोहचता अनेक ठिकाणी बांध फुटून नुकसान होण्याची शक्यता आहे.

**– रमेश लडके, शेतकरी**

कंत्राटदाराने जेसीपीने ओबडधोबड नाल्या काढल्या आहे. त्याची माती सुद्धा दूर टाकली नाही. त्यामुळे पाणी सोडल्यानंतर तीच माती पुन्हा बांधांमध्ये जाऊन कॅनलचे गेट माती भरून बंद होण्याची शक्यता आहे. त्यामुळे संपूर्ण बांध सिमेंटीकरण करावे. ज्यामुळे कोणत्याही शेतकऱ्यांचे नुकसान न होता. शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पाणी पोहचणे शक्य होईल.

**– प्रशांत कांबळे, शिरजगाव मोझरी**

धरणाच्या बांधांने असलेल्या शेतकऱ्यांनी आपल्या शेतात नाल्या केल्या नाही. त्याचे पाणी धरणाच्या बांधांमध्ये उतरते त्यामुळे माझ्या शेतात पाणी घुसते, सलग दोन वर्ष माझ्या शेतीचे नुकसान होत आहे. त्यामुळे यावर्षी धरणाचे पाणी सोडतांना आधी प्रशासनाने बांध फुटून माझ्या शेतीचे नुकसान झाल्यास भरपाई देण्याचे कबूल करावे. किंवा चांगले काम करून तातडीने धरणाचे पाणी सोडावे.– ललित हगवणे, शेतकरी

# आंतरराज्यीय चोर चरणसिंह भादा साथीदारासह जेरबंद

## १५ गुन्हे उघड, १०.१५ लाखांचा मुद्देमाल हस्तगत



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४ अमरावती**
महाराष्ट्रासह मध्यप्रदेश, छत्तीसगढमध् घरफोडी व लुटमार करणाऱ्या कुख्यात चरण भादा या चोरट्याला त्याच्या साथीदारासह स्थानिक गुन्हे शाखा व मोर्शी पोलिसांनी अटक केली. त्याने तब्बल १५ गुन्ह्यांची कबुली दिली. त्याच्याकडून १० लाख १५ हजारांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला आहे.पांढुर्णा येथील सराईत गुन्हेगार चरण भादा हा त्याच्या एका साथीदारासह सिंभोरा परिसरात असल्याची फिरत टीप स्थानिक गुन्हे शाखेला मिळाली होती त्या आधारावरपोलिसांनी पथकाने चरणसिंह गब्बुसिंह भादा आणि रवी उर्फ रंजीत राजेश चव्हाणया दोघांना शिताफीने ताब्यात घेतले. त्यांनी १५ घरफोडी व लुटमारीच्या घटनांची कबुली वि त्यांच्याकडून गुन्हयातील ९ लाख ४० हजार रुपये किमतीचे ७१ ग्रॅम सोने, रोख ५०,००० रुपये गुन्हा करण्यासाठी वापरलेली मोटर सायकल असा एकूण एकुण १० लाख १५ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. मोर्शी पोलीस पुढील तपास करीत आहे.चरणसिंग गब्बुसिंग भादा (रा. पांढुर्णा, मध्यप्रदेश) हा अट्टल घरफोड्या असून त्याच्याविरुद्ध महाराष्ट्र, मध्यप्रदेश, छत्तीसगढ राज्यामध्ये ५० पेक्षा अधिक घरफोडी व लुटमारीचे गुन्हे दाखल आहे. ही कारवाई पोलीस अधिक्षक विशाल आनंद, अप्पर पोलीस अधिक्षक पंकज कुमावत यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा प्रमुख पोलीस निरीक्षक किरण वानखडे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक सागर हटवार, पोलीस अंमलदार रविंद्र बावणे, बळवंत दाभणे, भुषण पेटे, पंकज फाटे, चालक संजय प्रधान, मोर्शी येथील स्कॉड विभागाचे छत्रपती करपते, स्वप्निल बायस्कर यांच्या पथकाने केली.

# निम्न पेढी प्रकल्पातील नागरिकांना घरकुल मंजूर

## पहिला हप्ता अन् स्थलांतरासाठी दोन लाख रूपयांचे अनुदान मिळणार

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२४ अमरावती–** निम्न पेढी प्रकल्पात यावर्षीपासून पाणी साठविण्याची परवानगी देण्यात आली आहे. परिणामी गोपगव्हाण गावापर्यंत पाणी येणार आहे. त्यामुळे या गावातील स्थलांतरला वेग देण्यात आला आहे. त्यासाठी नागरिकांना राहण्यासाठी घरकुल मंजूर करण्यात आले आहेत, अशी माहिती जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिली.

जिल्हाधिकारी कार्यालयात निम्न पेढी प्रकल्पाबाबत आढावा घेण्यात आला. बैठकीमध्ये जिल्हाधिकारी येरेकर यांनी हातुर्णा, गोपगव्हाण, कुंडखुर्द, अळणगाव, कुंड सर्जापूर या गावातील नागरिकांच्या स्थलांतरणाचा आढावा घेतला. नागरिकांनी पुनर्वसित गावात स्थलांतरण करावे, यासाठी त्यांना प्राधान्याने घरकुल मंजूर करण्यात येत आहे. यासाठी त्यांना घरकुलाचा पहिला हप्ता देण्यात येणार आहे. त्यासोबतच स्थलांतरासाठी दोन लाख रूपयांचे अनुदान देण्यात येणार आहे. गावातील पिण्याच्या पाण्याचा पुरवठा सुरळीत करण्यात येणार असून, विजेची समस्या निकाली काढण्यात येणार आहे. पाण्याचा प्रश्न असलेल्या गावात विंधनविहिरी घेण्यात येणार आहे.बुडीत क्षेत्रात जाणाऱ्या गावामधील स्थलांतराला वेग देण्यासाठी पुनर्वसित गावात प्रामुख्याने पाण्याची व्यवस्थाकरण्यात येणार आहे. तसेच पुनर्वसित गावात पायाभूत सुविधांसाठी ५७ कोटी रूपयांच्या कामाचे नियोजन करण्यात आले आहे.

ही कामे मंजुरीच्या प्रक्रियेत आहे. कुंड सर्जापूर येथील स्मशानभूमीच्या विकासासाठी निधी देण्यात आला आहे. जागाही ठरविण्यात आली असून येत्या काही दिवसात याठिकाणी कामे करण्यात येतील. स्थलांतरण वेगाने व्हावे, यासाठी घरकुल मंजुरीचे पत्र आणि पहिला हप्ताही तातडीने देण्यात येणार आहे. तसेच स्थलांतरणाच्या भत्त्यासाठी नागरिकांचे अर्ज घेण्यात येणार आहे. यावेळी सरपंच यांनी पुनर्वसित गावात येणाऱ्या समस्यांची माहिती दिली.

# अज्ञात वाहनाच्या धडकेत मायलेकाचा जागीच मृत्यू



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४, अमरावती.** मोर्शी भरधाव अज्ञात वाहनाची धडक बसल्यामुळे घडलेल्या भीषण अपघातात दुचाकीस्वार आई आणि मुलाचा जागीच मृत्यू झाला. अपघातात एक जण गंभीर जखमी आहे.मोर्शी ते आष्टी मार्गावरील सिंभोरा गावानजीक ही घटना घडली.

करीमशहा रहमानशहा (वय ५५ वर्ष), तमीजाबी रहमानशहा (वय ६८ वर्ष दोघेही रा. आष्टी) असे आहे. पोलीस सूत्राकडून प्राप्त माहितीनुसार, आष्टी येथील करीमशहा रहमानशहा, तमीजाबी रहमानशहा आणि करीमशहा यांचा मुलगा फारुक शहा करीमशहा (वय २४ वर्ष) हे मोटरसायकलने (एम एच ३१ आर ३३१२) आष्टी येथून मोर्शीला काही कामानिमित्त येत असतांना सिंभोरा गावाजवळ विरुद्ध दिशेने येणाऱ्या अज्ञात वाहनाने मोटर सायकलला जबर धडक दिली. प्रचंड रक्तस्त्राव होऊन करीम शहा रहमानशहा व तमीजाबी रहमानशहा यांचे जागीच दुर्देवी मृत्यू झाला.घटनेची माहिती मिळताच मोर्शीचे ठाणेदार राहुल आठवले यांनीउपजिल्हा रुग्णालय मोर्शी येथे रवाना केले. तानाजी युवा बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष राहुल पंडागरे, रवी परतेती, प्रवीण धोटे यांचेसुद्धा पोलिसांना सहकार्य लाभले. उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी करीमशहा व तमीजाबी यांना मृत घोषित केले तर फारुख शहा करीम शहा याला पुढील उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात हलविले. याप्रकरणी मोर्शी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. ठाणेदार राहुल आठवले यांच्या मार्गदर्शनाखाली स्कॉड विभागाचे पोलीस उपनिरीक्षक आकाश शिवणकर, पीएसआय राजू धुर्वे, छत्रपती करपते, स्वप्निल बायस्कर, अथर्व कोहळे हे अज्ञात वाहनाचा शोध घेत आहे.

# जनावरांची वाहतूक करणारी टेम्पो पकडली

## मोर्शी पोलीसांची कारवाई, ७.८६ लाखांचा मुद्देमाल जप्त



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४ मोर्शी** : जनावरांची अवैध वाहतूक करणारी दोन वाहने पोलिसांनी पकडली. त्यातून १२ जनावरांची सुटका करण्यात आली. जनावरांसह वाहनांची एकूण किंमत ७ लक्ष ८६ हजार रुपये आकारण्यात आलेली आहे.

मोर्शी येथील गुन्हे प्रकटीकरण पथकाने मोर्शी–अमरावती मार्गावर तळणी फाटा येथे नाकाबंदी करून मालवाहु ४०७ टेम्पो पकडला. चालक शेख राजीक शेख अमीर (वय ४० वर्षे, रा. ईस्लाम नगर वरूड जि. अमरावती) याच्या ताब्यातून २ वगार व १० रेडे अशी एकुण १२ जनावरे तसेच मालवाहु ४०७ टेम्पो (क्र. एम एच ४३ एफ ९७२९) असा एकूण ७,८६००० रुपयांचा मुद्देमाल जप्त करून करण्यात आला. जनावरे पिंपळखुटा मोठा येथील गौरक्षणमध्ये दाखल करण्यात आली. उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष खांडेकर यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक राहुल आठवले यांच्या नेतृत्वात फौजदार आकाश शिवणकर, पोलीस अंमलदार छत्रपती, करपते, स्वप्नील बायस्कर, अथर्व कोहळे चालक अब्दुल हबीब यांनी ही कारवाई केली.

# जिल्ह्यात दादासाहेब गायकवाड सबलीकरण योजना संथ गतीने

## केवळ ३८५ लाभार्थींना मिळाला लाभ; १,३८१ एकर शेती नावावर:



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती**
जिल्ह्यातील भूमिहीन शेतमजुरांच्या जीवनमानात आमूलाग्र बदल घडवण्यासाठी सामाजिक न्याय विभागामार्फत कर्मवीर दादासाहेब गायकवाड स्वाभिमान व सबलीकरण योजना राबविली जात आहे. या योजनेत आतापर्यंत ३८५ जणांना लाभ मिळाला असून, त्यांच्या नावे १,३८१ एकर शेती करण्यात आली आहे. मात्र, या आकडेवारीवरून ही योजना संथ गतीने सुरू असल्याचे दिसून येत आहे. लाभार्थ्यांना तत्काळ लाभ मिळावा, अशी मागणी करण्यात येत आहे.

राज्य शासनाच्या कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभिमान योजनेंतर्गत पात्र भूमिहीन व्यक्तींना शेतजमीन खरेदीसाठी १०० टक्के अनुदान दिले जाते. यामध्ये चार एकर जिरायत किंवा दोन एकर बागायत जमिनीचा समावेश आहे. पण, सध्या जमिनीचे दर वाढल्याने संबंधित अनुदानात जमीन मिळणे अवघड आहे. तसेच, शेतकरीही जमीन विक्रीस तयार नसतात हे वास्तवही आहे. कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभिमान योजनेंतर्गत अनुसूचित जाती, नवबौद्ध घटकातील दारिद्र्यरेषेखालील भूमिहीन लोकांना शेतजमीन देण्यात येते. यामधून संबंधितांना उदरनिर्वाहाचे साधन उपलब्ध होईल, असा हेतू असतो. भूमिहीन कुटुंबांना जमीन खरेदीसाठी राबविण्यात येणाऱ्या कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभिमान योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थी अनुसूचित जाती किंवा नवबौद्ध घटकातील असावा. त्याचबरोबर तो भूमिहीन असणे गरजेचे आहे.

१००% अनुदानावर शेती कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभिमान योजनेंतर्गत पात्र भूमिहीन व्यक्तींना शेतजमीन खरेदीसाठी १०० टक्के अनुदान दिले जाते. राज्य शासनाच्या सामाजिक न्याय विभागाकडून लाभार्थ्यांना हे अनुदान दिले जाते.

### लाभार्थ्यांनी लाभ घ्यावा

कर्मवीर दादासाहेब गायकवाड स्वाभिमान व सबलीकरण योजनेंतर्गत जिल्ह्यातील ३८५ जणांना लाभ मिळाला असून, १,३८१ एकर जमीन त्यांच्या नावे झाली आहे. –राजेंद्र जाधवर, सहायक आयुक्त, समाजकल्याण विभाग अर्ज कसा करावा संबंधित लाभार्थी हा भूमिहीन असावा. लाभार्थ्यांचे किमान वय १८ आणि कमाल ६० वर्षे असावे. त्याने शासनाने निश्चित केलेल्या अटीत बसणे गरजेचे आहे. या योजनेत पात्र असलेल्या लाभार्थ्यांना सहायक समाजकल्याण आयुक्त कार्यालयात जाऊन अर्ज करता येतो.

# एक दिवस सैनिकांसाठी अभियान राबवणार– जिल्हाधिकारी येरेकर

## शुभारंभ व माजी सैनिक मेळावा साजरा




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती**
भारतमातेच्या संरक्षणार्थ आपल्या जीवाची पर्वा न करता अविरत देश सेवा करणारे सैनिक, शहिदांचे कुटुंबीय, वीरमाता, वीरपत्नी व त्यांचे पाल्यांना जिल्हा प्रशासनाची मदत व्हावी, यासाठी दर महिन्याच्या पहिल्या मंगळवारी, एक दिवस सैनिकांसाठी हे अभियान राबवण्यात येणार असून, जिल्हा प्रशासनाच्या वतीने संबंधित विभाग त्यांचे प्रश्न तातडीने सोडविण्यासाठी सहकार्य करतील,असे आश्वासन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी मंगळवार २३ रोजी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे मंगळवारी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयामार्फत सशस्त्र सेना ध्वज निधी संकलन कार्यक्रमाचा शुभारंभ जिल्हाधिकारी येरेकर यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी राज्य उत्पादन शुल्क अधीक्षक शशिकांत गजरे, श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. प्रकाश ठाकरे, जिल्हा सैनिक अधिकारी आनंद पाथरकर यांची यावेळी उपस्थिती होती. आपले सैनिक सीमेवर देशाच्या संरक्षणासाठी रात्रंदिवस सिमेवर लढत असतात. सैनिक आणि त्यांच्या कुटुंबियांप्रती प्रत्येक नागरीकास अभिमान असायलाच हवा, देशाची अखंडता, प्रगती, देशाचे अस्तित्व यांचे संरक्षण करणाऱ्या सैनिकांचे ऋण व्यक्त करणे गरजेचे आहे. देशसेवा करताना ते आपल्या कुटुंबियांना पुरेसा वेळ देऊ शकत नाहीत. महसूल, मोजणी, कृषी, पोलिस विभाग अशा विविध शासकीय कार्यालयांकडे त्यांची प्रलंबित असलेली कामे तातडीने पूर्ण व्हावीत, यासाठी दर महिन्याच्या पहिल्या मंगळवारी 'एक दिवस सैनिकांसाठी' हा अभिनव उपक्रम राबवण्यात येणार आहे.

सैनिक बांधव देशाच्या सीमेवर लढतात. त्यामुळेच आपण स्वातंत्र्याची अनुभूती घेत आहोत. आजवरच्या इतिहासात भारतीय सैनिकांच्या शौर्यगाथा आपण ऐकत आलो आहोत. त्यांच्या शौर्यगाथेतून आपल्याला आणि येणाऱ्या पिढीला निरंतर प्रेरणा मिळत राहील. सैनिक बांधवांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी सशस्त्र सेना ध्वजदिन राबविण्यात येतो. यातून सैनिकांच्या मुलांचे शिक्षण, आरोग्य, सामाजिक कार्यासाठी हा निधी खर्च करण्यात येतो. मागील वर्षी अमरावती जिल्ह्याने दिलेल्या उद्दिष्टांपेक्षा जास्त ध्वजनिधी संकलित केला. यावर्षी देखील दिलेल्या उद्दिष्टांपेक्षा अधिक ध्वजनिधी जमा करण्यासाठी आपण सर्व एकत्रितरित्या प्रयत्न करूया. यावर्षी ३ कोटी रुपये ध्वजनिधी जमा करण्याचे उद्दिष्ट ठेऊया, असा विश्वास जिल्हाधिकारी येरेकर यांनी यावेळी व्यक्त केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आनंद पाथरकर यांनी केले. संचलन वैभव निमकर तर आभार सुरेखा पथोड यांनी मानले.

ध्वजदिन निधीसाठी २५ लाखांचा धनादेश: शहीद जवानांच्या वीरपत्नी, वीरमाता, शौर्यपदकधारक, त्यांचे कुटुंबीयांना अर्थिक मदत देता यावी यासाठी श्री शिवाजी शिक्षण संस्थेमार्फत २५ लाख रुपयांचा धनादेश जिल्हाधिकारी येरेकर यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला. सैनिकांच्या कुटुबियांचे प्रश्न सोडवण्यासाठी निधीचा वापर सैनिक बांधवांचे तसेच त्यांच्या कुटुंबियांचे प्रश्न सोडवण्यात येणार आहेत. सैनिक बांधव तसेच त्यांच्या कुटुंबियांनी आपल्या तक्रारी जिल्हा सैनिक अधिकारी आनंद पाथरकर यांच्याकडे नोंदवाव्यात. एक दिवस सैनिकांसाठी या अभियानांतर्गत या तक्रारींवर कार्यवाही करण्यात येणार.

# बहिरम यात्रेच्या लिलावातून जिल्हा परिषदेला ४२ लाखांचे उत्पन्न

## मागील वर्षापेक्षा दहा लाखांनी अधिक ६८७ प्लॉटचा लिलाव यशस्वी



विदर्भ प्रजासत्ताक
दि.२४अमरावती

चांदूरबाजार तालुक्यातील प्रसिद्ध बहिरम यात्रेच्या लिलावातून यावर्षी जिल्हा परिषदेला ४२ लाख रुपयांचे उत्पन्न मिळाले आहे. हे उत्पन्न मागील वर्षाच्या तुलनेत तब्बल दहा लाख रुपयांनी अधिक आहे, जे एक महत्त्वाचे आर्थिक यश दर्शवते.

या लिलाव प्रक्रियेत एकूण ६८७ प्लॉटचा यशस्वी लिलाव करण्यात आला. काही तांत्रिक आणि प्रशासकीय कारणांमुळे १५ प्लॉटचा फेरलिलाव घेण्यात आला, जो दुसऱ्या टप्प्यात यशस्वी ठरला.

बहिरम यात्रा ही चांदूरबाजार तालुक्यातील एक मोठी आणि पारंपरिक यात्रा म्हणून ओळखली जाते, जिथे दरवर्षी मोठ्या संख्येने व्यापारी, फेरीवाले आणि भाविक उपस्थित राहतात. मागील वर्षी या यात्रेच्या लिलावातून जिल्हा परिषदेला सुमारे ३२ लाख रुपयांचे उत्पन्न मिळाले होते.

यावर्षी व्यापाऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद, यात्रेचे उत्तम नियोजन आणि पारदर्शक लिलाव प्रक्रिया यामुळे उत्पन्नात लक्षणीय वाढ झाली, परिणामी ४२ लाख रुपयांचे उत्पन्न मिळाले.

या संपूर्ण लिलाव प्रक्रियेचे आयोजन आणि अंमलबजावणी सहाय्यक गटविकास अधिकारी गणेश घोगरकर यांच्या नेतृत्वाखाली पार पडली. यात्रेचे अधीक्षक रामेश्वर रामागडे यांनी संपूर्ण व्यवस्थेवर लक्ष ठेवले.

याशिवाय, सहाय्यक अधीक्षक निखिल नागे, रितेश देशमुख, सहाय्यक प्रशासन अधिकारी समीर लेंडे, विस्तार अधिकारी सुरेश लांडगे, ग्रामपंचायत अधिकारी संदीप गोहत्रे, शिवप्रसाद सोनोने आणि विकी देशमुख यांच्यासह तालुक्यातील सर्व ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनी सहकार्य केले.लिलावाच्या काळात कोणताही अनुचित प्रकार होऊ नये यासाठी प्रशासनाने आवश्यक ती खबरदारी घेतली होती. नियम व अटी स्पष्टपणे जाहीर करण्यात आल्या होत्या, तसेच प्रत्येक टप्प्यावर पारदर्शकता राखण्यात आली. यामुळे व्यापाऱ्यांमध्ये विश्वासाचे वातावरण निर्माण झाले आणि लिलावाला चांगला प्रतिसाद मिळाला.

# महिलांनी अवैध दारू विक्रीला रोखले

## शिरजगाव कोरडे येथे उपसरपंचासह २५ महिलांची कारवाई, पोलिस ठाण्यात डेरा

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२४शिरजगाव कोरडे

चांदूर रेल्वे तालुक्यातील शिरजगाव कोरडे गावात उपसरपंचासह २५ ते ३० महिलांनी अवैध देशी दारू विक्रीला पायबंद घातला. सोमवारी सायंकाळी अंदाजे ७.३० वाजता महिलांनी घरातून दारू विकणाऱ्या एका व्यक्तीला पोलिसांच्या स्वाधीन केले. या घटनेची माहिती दारूबंदी विभागालाही देण्यात आली होती, मात्र त्यांनी कोणतीही कारवाई केली नाही.

या कारवाईनंतर महिला रात्री दहा वाजेपर्यंत पोलिस ठाण्यात थांबून होत्या. यावेळी अवैध दारू विकणाऱ्या



व्यक्तीच्या घरातून सुमारे ११ हजार १०० रुपयांची दारू जप्त करण्यात आली. यापूर्वीही गावातील महिलांनी याच व्यक्तीला अवैध दारू विक्रीप्रकरणी पोलिसांच्या ताब्यात दिले होते, मात्र तरीही त्याचा व्यवसाय सुरूच होता.

यामुळे संतप्त झालेल्या उपसरपंच संगीता बद्रे, ताराबाई सोनसागडे, रेश्मा भंडारी, प्रतिभा चाचने, ऐश्वर्या चाचने यांच्यासह २५ ते ३० महिलांनी संबंधित व्यक्तीच्या घरावर धडक दिली. त्यानंतर त्यांनी पोलिस ठाण्यात जाऊन आपला निषेध नोंदवला.

शहर आणि तालुक्यात अवैध देशी दारू विक्रीचे प्रमाण वाढले असून, यामुळे ग्रामीण तसेच शहरी भागातील महिला त्रस्त झाल्या आहेत. काही नागरिकांच्या मते, शहराच्या अनेक भागांत देशी दारूच्या नावाखाली रसायनयुक्त बनावट दारू तयार केली जात आहे. या बनावट दारूमुळे काही तरुणांचा बळीही गेल्याचा आरोप आहे. असे असतानाही, दारूबंदी विभाग आणि पोलिस याकडे दुर्लक्ष करत असल्याचा स्थानिकांचा आरोप आहे.

# संविधान बांधिलकी महोत्सव बडनेऱ्यात संविधान जनजागृती



विदर्भ प्रजासत्ताक
दि.२४बडनेरा

संविधान बांधिलकी महाराष्ट्र महोत्सवाअंतर्गत अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या मार्गदर्शनाखाली बडनेरा येथे – साप्ताहिक बैठक घेऊन संविधान जागर व सदस्यता नोंदणी मोहीम न राबविण्यात आली.या उपक्रमामार्फत नागरिकांत भारतीय संविधानातील मूल्ये, वैज्ञानिक दृष्टिकोन व विवेकनिष्ठ समाजनिर्मितीबाबत व्यापक जनजागृती करण्यात आली. यावेळी संविधान विषयक पत्रकांचे वितरण करण्यात आले. १.यावेळी महाराष्ट्र अंधश्रद्धा १. निर्मूलन समितीचे प्रफुल मंदा १. श्रीघर, दिलीप लाडे आदी नी मान्यवर उपस्थित होते. भारतीय संविधानाचे सामाजिक महत्त्व, संविधानिक मूल्यांची जपणूक, वैज्ञानिक विचारांचा प्रसार तसेच अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कार्यपद्धती विषयी मान्यवरांनी सविस्तर माहिती दिली आहे.कार्यक्रमाला बाळू मेश्राम, चेतन आगलावे, दामू काळखैर, गोपाल वानखडे, सुरेखा तायडे, कुंदा मेश्राम, सारिका राहुल, कल्पना कोट्रांगळे, चंद्रप्रकाश अडकणे, प्रकाश राहुल, सरिता लाडे, पुष्पा जाधव, कुमुद मेश्राम, अनुपमा गोंडाणे, रहेमत शहा, विजय डवरे, वर्षा पकडे, मोनाली सदावर्ते, मनाली पहुरकर, रजनी सवाई आदींसह अनेक कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिलीप लाडे यांनी तर आभार बाळासाहेब मेश्राम यांनी मानले.

# अमरावती जिल्ह्यात ८ नगरपालिका नगरपंचायतींवर महिला नगराध्यक्ष

## पुरुषांच्या वाट्याला केवळ ४ नगराध्यक्षपदे

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२४अमरावती

अमरावती जिल्ह्यातील दहा नगरपालिका आणि दोन नगरपंचायतींच्या निवडणुका नुकत्याच पार पडल्या. या निवडणुकांमध्ये आठ स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभार महिला नगराध्यक्षांच्या हाती आला आहे. उर्वरित चार ठिकाणी पुरुष नगराध्यक्ष शहराचा कारभार सांभाळतील.

शेंदुरजनाघाट, चांदूर रेल्वे, चांदूर बाजार, धामणगाव रेल्वे, दर्यापूर, अचलपूर आणि मोर्शी या सात नगरपालिका, तसेच नांदगाव खंडेश्वर नगरपंचायतीमध्ये महिला नगराध्यक्षा निवडून आल्या आहेत. याउलट, धारणी नगरपंचायत, अंजनगाव सुर्जी, चिखलदरा आणि वरुड नगरपालिकांमध्ये पुरुष नगराध्यक्षांनी विजय मिळवला आहे.

महिला नगराध्यक्षांमध्ये शेंदुरजनाघाट येथे भाजपच्या सुवर्णा वरखडे, चांदूर रेल्वेमध्ये वंचित बहुजन आघाडीच्या प्रियंका विश्वकर्मा, चांदूर बाजारमध्ये प्रहारच्या मनीषा नांगलिया, धामणगाव रेल्वेमध्ये



भाजपच्या अर्चना रोठे, दर्यापूरमध्ये काँग्रेसच्या मंदाकिनी भारसाकळे, अचलपूरमध्ये भाजपच्या रुपाली माथने, मोर्शीमध्ये शिंदे सेनेच्या प्रतीक्षा गुल्हाने आणि नांदगाव खंडेश्वरमध्ये शिवसेनेच्या (उबाठा) प्राप्ती मारोटकर यांचा समावेश आहे. नागरिकांनी त्यांना आपापल्या शहराचा कारभार चालवण्याची संधी दिली आहे.

पुरुष नगराध्यक्षांमध्ये चिखलदरा येथे काँग्रेसचे शेख अब्दुल, वरुड येथे भाजपचे ईश्वर सलामे, अंजनगाव सुर्जीमध्ये भाजपचे अविनाश गायगोले आणि धारणी नगरपंचायतीमध्ये भाजपचे सुनील चौथमल यांनी विजय मिळवला आहे. आगामी पाच वर्षांसाठी या शहरांची सत्ता त्यांच्या हातात राहील.

दरम्यान, काही नगरपालिका आणि नगरपंचायतींमध्ये नगराध्यक्ष ज्या पक्षाचे आहेत, त्या पक्षाला निम्म्यापेक्षा जास्त नगरसेवक निवडून आणता आलेले नाहीत. यामुळे त्यांना कारभार चालवताना अडचणींचा सामना करावा लागू शकतो.

स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना ५० टक्के आरक्षण आहे. त्यामुळे एकूण १२ जागांपैकी निम्म्या जागा महिलांना मिळणे अपेक्षित होते. मात्र, प्रत्यक्षात त्याहून अधिक महिला निवडून आल्या आहेत. विशेषतः दर्यापूर येथील नगराध्यक्षपद सर्वांसाठी खुले होते. या जागेसाठी पुरुष आणि महिला दोघांनीही प्रयत्न केले, परंतु पुरुषांना मागे टाकत एका महिलेने विजय मिळवला.

# सार्वत्रिक निवडणुकीच्या तयारीसाठी निवडणूक अधिकारी तथा अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांची पाहणी



विदर्भ प्रजासत्ताक
दि.२४अमरावती

अमरावती महानगरपालिकेतील आगामी सार्वत्रिक निवडणुकीच्या पारदर्शक व सुरळीत आयोजनासाठी आज निवडणूक अधिकारी तथा अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी सांस्कृतिक भवन व आयटीआय कॉलेजची पाहणी केली.अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी यावेळी सांस्कृतिक भवन येथील एतच् (इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र) स्टोअर आणि आयटीआय कॉलेज येथे होणाऱ्या निवडणूक प्रशिक्षण केंद्र यांचा सविस्तर आढावा घेतला. त्यांनी एतच् स्टोअरमधील सुरक्षितता, उपकरणांची योग्य साठवण व्यवस्था, सीसीटीव्ही निगराणी, प्रवेश नियंत्रण आणि यंत्रांची तपासणी केली. तसेच, त्यांनी अधिकाऱ्यांकडून एतच् व्यवस्थापनासंबंधी मार्गदर्शन घेतले व सर्व नियमांचे काटेकोर पालन करण्याचे निर्देश दिले.यावेळी त्यांनी विशेषतः एतच् च्या सुरक्षिततेवर भर दिला, कारण मतदान प्रक्रियेत यंत्रांची अचूकता आणि सुरक्षितता ही पारदर्शक निवडणुकीसाठी अत्यंत महत्त्वाची आहे. आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी स्टोअरमध्ये सुरक्षा उपायांची सखोल पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सुधारणा सुचवल्या.त्यानंतर त्यांनी आयटीआय कॉलेज येथे होणाऱ्या निवडणूक प्रशिक्षणाची तयारी तपासली. प्रशिक्षण केंद्राची बैठक व्यवस्था, तांत्रिक साधने, मार्गदर्शन सत्रांची रूपरेषा आणि कर्मचारी प्रशिक्षणासाठी लागणाऱ्या सुविधा यांचा त्यांनी सविस्तर आढावा घेतला. त्यांनी स्पष्ट केले की, निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी प्रशिक्षण महत्त्वाचे असून, कर्मचाऱ्यांना संपूर्ण मार्गदर्शन मिळणे आवश्यक आहे.आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांना निर्देश दिले की सर्व तयारी वेळेत पूर्ण करावी आणि निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करावे. त्यांनी सांगितले की, शहरातील प्रत्येक एतच् स्टोअर आणि प्रशिक्षण केंद्राची वेळोवेळी पाहणी केली जाईल, जेणेकरून मतदान प्रक्रियेतील प्रत्येक टप्पा पूर्णपणे सुरक्षित आणि पारदर्शक राहील. त्यांनी आगामी निवडणुकीसाठी आपले पूर्ण सहकार्य आणि तत्परता व्यक्त केली.सार्वत्रिक निवडणुकीच्या पारदर्शकतेसाठी अमरावती शहरात एतच् व्यवस्थापन आणि कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणासाठी सुरू असलेली तयारी उच्च स्तरावर असल्याचे पाहणीदरम्यान स्पष्ट झाले. आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांची देखरेख ही निवडणुकीच्या सुरळीत आणि पारदर्शक आयोजनाची खात्री देणारी ठरली आहे.

# मेळघाटचा रानआवळा बनतोय आरोग्याचा आधार

## च्यवनप्राश निर्मितीतून आदिवासी महिलांना रोजगाराच्या नव्या संधी

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२४अचलपूर

अचलपूर (जि. अमरावती) हिवाळ्यात होणारी सर्दी, खोकला, ताप तसेच वातविकारांवर प्रभावी ठरणाऱ्या आणि रोगप्रतिकारक शक्ती वाढविणाऱ्या आवळ्याच्या च्यवनप्राशची निर्मिती आता मेळघाटात सुरू झाली. अस्सल रानआवळ्यांपासून तयार होणाऱ्या या च्यवनप्राशमुळे आदिवासी महिलांना रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध झाल्या असून, या उपक्रमाला स्फूर्ती क्लस्टरचा महत्त्वपूर्ण पुढाकार लाभला आहे.

चिखलदरा, मेळघाटातील आमझरी, आलाडोह, शहानूर या जंगल परिसरात मोठ्या प्रमाणात रानआवळ्याची झाडे



आढळतात. या जंगलातून रानआवळा संकलनाचे काम आदिवासी महिला करतात. साधा आवळा आणि रानआवळा यात फरक असून, रानआवळा आकाराने लहान असतो आणि तो घनदाट जंगलात जाऊन काळजीपूर्वक तोडावा लागतो. आवळा जमिनीवर पडू नये म्हणून झाडाखाली जाळी लावून संकलन केले जाते. डाग न लागलेले, ताजे आणि दर्जेदार आवळे च्यवनप्राश निर्मितीसाठी वापरले जातात. त्यामुळे पोषकतत्त्व टिकून राहते.

रानआवळ्यात फायबरचे प्रमाण अधिक आणि साखरेचे प्रमाण तुलनेने कमी असल्याने च्यवनप्राशला नैसर्गिक घट्टपणा येतो व तो दीर्घकाळ टिकतो. च्यवनप्राश तयार करताना गीर गाईच्या तुपाचा वापर केला जात असून, ही संपूर्ण प्रक्रिया सुमारे दोन दिवस चालते. वर्षभर सेवनासाठी उपयुक्त असलेल्या या च्यवनप्राशमध्ये जवळपास ३५ प्रकारच्या औषधी वनस्पतींचा समावेश केला जातो. अश्वगंधा, शतावरी, पुष्करमूळ, विदरीकांद, नागरमोथा, पुनर्नवा, जिवंती, दालचिनी, तेजपत्र, खडीसाखर, गीर गाईचे तूप आदी औषधी घटकांच्या मिश्रणातून हे च्यवनप्राश तयार केले जाते, अशी माहिती डॉ. सुमिरात भालेराव यांनी दिली.

### उद्योगाचा दर्जा मिळावा

चिखलदरा परिसरातील आदिवासींच्या पारंपरिक व्यवसायाला उद्योगाचा दर्जा मिळावा, या उद्देशाने शहराच्या योजनेंतर्गत स्फूर्ती क्लस्टरच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविले जात आहेत. मध, जांभूळ, सीताफळ, कॉफी प्रक्रिया, हिरडा अशा जंगलातील वनौषधी फळांवर प्रक्रिया करून नवी उत्पादने तयार केली जात आहेत. या उपक्रमांतून सुमारे ६०० आदिवासी महिलांना रोजगार उपलब्ध झाला.

**– सुनील भालेराव, संचालक, स्फूर्ती क्लस्टर.**

# लेखणी वाचकांच्या अंत:करणात पोहोचायला हवी

## डॉ. वसंत आबाजी डहाके यांचे प्रतिपादन –परिवर्तन विचारवेध साहित्य संमेलन

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२४अमरावती

चळवळीतल्या साहित्यातून वेदना व्यक्त झाली आणि विद्रोहही व्यक्त झाला. आपल्या साहित्याचे प्रेम हे जसे मूल्य आहे, तसेच विद्रोह हेही मूल्य आहे. पिढ्यान्पिढ्या दडपलेल्या मनांनी विद्रोहाची भाषा उच्चारायची नाही तर काय करायचे? तुकाराम महाराजांनी देखील नाठाळाच्या माथ्यावर काठी हाणण्याची भाषा उच्चारली आहे. कवी स्वत:ची दु:खे व्यक्त करत असतो, तसेच त्याने जगाची दु:खे व्यक्त करावी. दु:खी पीडित सामान्य जनांविषयी अपार कळवळा असल्याशिवाय विद्रोह जन्माला येत नाही. पण तुकारामांना अभिप्रेत असलेला निर्मळ व निरागस धर्म आपल्या भूमीत रुजावा असे वाटत असेल तर मनात प्रेम असायलाच हवे. म्हणून लेखकांच्या अंत:करणात जिव्हाळा असल्याशिवाय त्यांच्या लिहिण्याचा स्पर्श वाचकांच्या अंत:करणाला होणार नाही, असे प्रतिपादन संमेलनाध्यक्ष डॉ. वसंत आबाजी डहाके यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून केले.



मराठी भाषा विभाग महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई अनुदानित, परिवर्तन प्रबोधिनी, द. इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स अमरावती व बिलीव्ह फाऊंडेशन अमरावतीद्वारा आयोजित राज्यस्तरीय तिसरे परिवर्तन विचारवेध साहित्य संमेलन शेगाव नाका अमरावती येथील अभियंता भवनमध्ये उत्साहात सुरू झाले. या संमेलनाचे अध्यक्ष म्हणून जेष्ठ साहित्यिक डॉ. वसंत आबाजी डहाके, स्वागताध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक, स्तंभलेखक तथा विचारवंत डॉ. श्यामसुंदर निकम, तर उदघाटक म्हणून भारतीय जैन संघटना पुणेचे विश्वस्त ज्येष्ठ समाजसेवक सुदर्शन गांग, रिद्धपूर मराठी भाषा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अविनाश आवलगावकर, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाच्या सदस्य डॉ. प्रभा गणोरकर, पूर्वाध्यक्ष डॉ. रा. गो. चवरे, डॉ. गजानन कोटेवार, इंजि. सुनील राठी, इंजि. राम विघे, परिवर्तन प्रबोधिनी अध्यक्ष शोभा रोकडे, सचिव रेखा बेलसरे हे मान्यवर उपस्थित होते.

ग्रंथदिंडीने साहित्य संमेलनाची यशस्वी सुरुवात झाली. त्यानंतर डॉ. पायल रोकडे यांचे स्वागत नृत्य झाले. डॉ. नयना दापूरकर यांच्या माय मराठी गीताने व्यासपीठावरील प्रमुख मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. संमेलनाध्यक्ष डॉ. वसंत आबाजी डहाके यांचे हस्ते विविध मान्यवरांच्या उपस्थितीत ग्रंथपूजनाने संमेलनाची सुरुवात झाली. त्यानंतर अमरावती जिल्ह्यातील ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सुभाष सावरकर, डॉ. रमेश अंधारे, मुक्ता केचे, डॉ. राज यावलीकर, रजनी राठी, प्रतिमा इंगोले, अनुराधा वर्हाडे यांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर कथालेखन व काव्यलेखन स्पर्धेतील पुरस्कार वितरण पार पडले.

# इच्छुकांचे गुडघ्याला बाशिंग; तिकीट मिळण्यापूर्वीच अनेकांनी सुरू केला प्रचार

अरुण जोशी

## आघाडी, युती ठरण्याआधीच मीच उमेदवार



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४अमरावती**

तब्बल साडेतीन वर्षाच्या प्रतीक्षेनंतर होऊ घातलेल्या महापालिका निवडणुकीने इच्छुकांच्या राजकीय धावपळीला वेग आला आहे. पक्षाकडून उमेदवारी निश्चित होण्याआधीच अनेक इच्छुकांनी वेट प्रचाराला सुरुवात केली असून, घरोघरी संपर्क, बैठकांचा सपाटा आणि प्रचाराचा शुभारंभ सुरू झाला आहे

२०१७ मध्ये झालेल्या मागील महापालिका निवडणुकीनंतर विविध कारणांमुळे निवडणूक लांचणीवर पडत गेली या कालावधीत इच्छुकांची संख्या लक्षणीय वाढली. अनेकांनी गेल्या वर्षभरापासूनच आपली उमेदवारी गृहीत धरत प्रभागात 'मशागत' सुरू केली होती. मंगळवारपासून उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सुरुवात झाली. विशेषतः प्रभाग रचना निश्चित झाल्यानंतर संपर्क वाढविण्यात आला. मात्र, आरक्षणाच्या फेररचनेमुळे काहींच्या तयारीवर पाणी फेरले गेले, तर काही ठिकाणी महिला आरक्षणामुळे 'सौभाग्यवर्ती'ना संधी देण्याची तयारी सुरू केली.

**युती, आघाडी की स्वबळ ? राजकीय पक्ष संभ्रमात !**

महायुती वा महाविकास आघाडी करायची की स्वतंत्र लढायचे, यावर अद्याप एकमत झालेले नाही. मंगळवारपासून उमेदवारी अर्ज दाखल करणे सुरू झाले. त्यामुळे जागावाटप, मित्रपक्षांसाठी किती जागा सोडायच्या आणि स्वतःकडे किती ठेवायच्या, हे गणित गुलदस्त्यातच आहे

या अनिश्चिततेमुळे तिकीट वाटप लांबले आहे. तिकिटे लवकर जाहीर केल्यास बंडखोरी उफाळते, हा अद्याप उमेदवार जाहीर केले नाहीत. पण अनुभव लक्षात घेता अनेक पक्षांनी काही घटकपक्षांतील माजी नगरसेवकांनी शहरात प्रचार सुरू केला आहे.

# भोंगे, हनुमान चालीसा कुठे गेली? नवनीत राणा यांचा सवाल

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४अमरावती**

शिवसेना-मनसे युतीवर भाजप नेत्या व माजी खासदार नवनीत राणा यांनी जोरदार टीका केली आहे. दोन भाऊ एकत्र येत आहेत ही चांगली गोष्ट असली, तरी ही एकत्रीकरणाची प्रक्रिया केवळ राजकीय स्वार्थासाठी असल्याचा आरोप त्यांनी केला. नगरपरिषद व नगरपंचायत निवडणुकांमध्ये सेना-मनसेचा शेवटच्या क्रमांकावर निकाल लागत असल्याचे वास्तव असल्याचेही त्यांनी नमूद केले.ज्या पक्षाकडे कधीकाळी मुख्यमंत्री बनवण्याची ताकद होती, तो पक्ष आता संपुष्टात आल्याचा दावा नवनीत राणा यांनी केला. उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांना प्रश्न विचारत त्यांनी सांगितले की, पूर्वी राज ठाकरे माझ्या हिंदू बांधवांनो, भगिनींनो असा नारा देत होते, मात्र उद्धव ठाकरे यांची भेट झाल्यानंतर आता ते महाराष्ट्राचे माझे सर्व मतदार असे बोलत आहेत. या दोन भूमिकांमध्ये मोठा विरोधाभास असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.उद्धव ठाकरे यांच्यावर टीका करताना नवनीत राणा म्हणाल्या की, ते चादर चढवणारे आहेत आणि त्यांना मतदान करणारेही तसेच आहेत. मग आता भोंगे, मशिदीविरोधातील भूमिका आणि हनुमान चालीसा कुठे गेली? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.यावेळी त्यांनी ठामपणे सांगितले की, आगामी निवडणुकांमध्ये उद्धव ठाकरे आणि त्यांच्या सहकाऱ्यांची सर्व राजकीय दुकानदारी बंद होणार असून, महानगरपालिकेत फक्त भाजपचा आणि भगव्याचा झेंडा फडकणार आहे.



# पोलीस आयुक्त उतरले रस्त्यावर वाहतूक व्यवस्थेची केली पाहणी




**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४अमरावती**

शहरातील वाहतूक व्यवस्थेच्या पाहणीकरिता पोलीस आयुक्त राकेश ओला मंगळवारी सायंकाळी रस्त्यावर उतरले. मात्र वाहतूक शाखेच्या तिन्ही अधिकाऱ्यांना फोन करून बोलवावे लागले. त्यामुळे आयुक्त चांगलेच संतापले होते.अमरावती शहरात वाहतूक व्यवस्था विस्कळीत झाली असूनदिवसेंदिवस हा वाहतुकीची समस्या वाढत चालली आहे. रस्त्याने पायीचालणाऱ्या व्यक्तींनासुध्दा रस्त्यावर चालणे कठीण झाले आहे. तीनमहिन्यापासून रेल्वेपुल बंद असल्यामुळे नागरिकांनानाहक त्रास सहन करावा लागत आहे. प्रत्येक चौकात वाहनांच्या रांगा लागत आहे. तसेच चौकातील सिग्नल कधी बंद तर कधी सुरू राहतात आणि वाहतूक कर्मचारी सुध्दा कधीतरी दिसतात. पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी मंगळवारी सायंकाळी स्वतः रस्त्यावर उतरून शहरातील वाहतूक व्यवस्थेची पाहणी केली. इर्विन चौकात त्यांना दोन कर्मचारी दिसले. परंतु एकही अधिकारी उपस्थित नव्हता. आयुक्तांनी रिडरच्या फोनवर संबंधित अधिकाऱ्यांशी संवाद साधला. त्यानंतर अधिकारी पोहचले. त्यावेळी आयुक्त चांगलेच संतापले होते. त्यानंतरत्यांनी नवाथे, गोपालनगर आणि बडनेरा येथील वाहतूक व्यवस्थेची पाहणी केली. शहरातील कोणत्या सिग्नलचा किती वेळ आहे याबाबत संपूर्ण माहिती घेतल्यानंतर शहरातील काही सिग्नलचे टाईम बदलविण्याच्या सुचना त्यांनी दिल्या. जिल्हा सामान्य रुग्णालयात एन्ट्री व एक्झीट वेगवेगळे करण्याबाबत आयुक्त लवकरच निर्णय घेणार आहे.शहरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्याकरिता तत्कालीन पोलीस आयुक्त चावरिया यांनी गाडगेनगर, राजापेठ आणि फ्रेजरपुरा असे तीन वेगवेगळे विभाग केले होते आणि तिन्ही अधिकाऱ्यांना वेगवेगळे कार्यालय दिले होते. परंतु तिन्ही अधिकारी इर्विन चौकातील वाहतूक शाखेच्या मुख्य कार्यालयाच्या खुर्चीकरीता संगीत खुर्ची खेळतांना दिसत आहेत.

# तहसील कार्यालयाजवळ अतिक्रमण कायम, आदेशांची अंमलबजावणी शून्य



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४अचलपूर**

अचलपूर तहसील कार्यालय परिसरातील मागील बायपास रोडवर अवैध टिनाच्या खोक्यांमुळे गंभीर वाहतूक कोंडी निर्माण झाली आहे. या अतिक्रमणामुळे वाहनधारक, पादचारी तसेच उपजिल्हा रुग्णालयाकडे जाणाऱ्या रुग्णवाहिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. नागरिक व व्यावसायिकांनी याबाबत १२ सप्टेंबर २०२४ रोजी निवेदन दिले होते, तसेच जिल्हाधिकाऱ्यांनी ६ जानेवारी २०२५ रोजी नगर परिषदेला तातडीच्या कारवाईचे आदेश दिले होते. वाहतूक पोलिसांनीही स्वतंत्र पत्र देऊन अतिक्रमण हटवण्याची मागणी केली होती.मात्र या सर्व आदेशांनंतरही नगर परिषदेने आजतागायत कोणतीही ठोस कारवाई केलेली नसल्याने नाराजी व्यक्त होत आहे. अतिक्रमणधारकांना अभय आहे का? असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. दरम्यान, नगर परिषदेचे मुख्याधिकारी धीरज कुमार गोहाड यांनी तहसील कार्यालयाजवळील रस्त्यावरील खोके लवकरच हटवण्यात येतील, असे आश्वासन दिले आहे.

# मजबुरीची युती? उबाठा-मनसेवर अनिल बोंडे यांचा हल्लाबोल

## मुंबईचा महापौर भाजपाचाच होणार : खासदार अनिल बोंडे

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४ अमरावती**

भाजप नेते तथा खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आणि मनसेच्या युतीवर जोरदार टीका केली आहे. महाराष्ट्रातील नगरपालिका निवडणुकांचे निकाल स्पष्टपणे दर्शवतात की भारतीय जनता पार्टी ही राज्यातील नंबर एक पक्ष ठरली आहे, तर त्यानंतर महायुतीतील इतर पक्षांचा क्रमांक लागतो, असे बोंडे यांनी म्हटले.डॉ. बोंडे म्हणाले की, संपूर्ण महाराष्ट्रात झालेल्या नगरपालिका निवडणुकांमध्ये शिवसेना (उबाठा) गटाला केवळ ८ नगराध्यक्ष पदे मिळाली आहेत, तर मनसेला कदाचित फक्त १ नगराध्यक्ष मिळाला आहे.ही कामगिरी तर नोटालाही मागे टाकणारी आहे. त्यामुळेच आता हे लोक कोणत्याही प्रकारची युती जमवण्याचा प्रयत्न करत आहेत. ही युती विश्वासातून नाही, तर निव्वळ मजबुरीतून होत आहे, असा घणाघाती आरोप त्यांनी केला.मुंबई महानगरपालिकेबाबत बोलताना डॉ. बोंडे म्हणाले,यावेळी मुंबईचा महापौर भाजपाचाच होणार आहे. मुंबईकरांच्या मनात याबाबत शंभर टक्के खात्री आहे. जशी महाराष्ट्राच्या जनतेच्या मनात आधी खात्री होती, तशीच आजही आहे. कोण सोबत येतं किंवा येत नाही, याचा भाजपाला काहीही फरक पडत नाही.



**संजय राऊतांवर जोरदार शाब्दिक प्रहार**

शिवसेना (उबाठा) नेते संजय राऊत यांनी केलेल्या भ्रष्टाचाराच्या आरोपांवर प्रतिक्रिया देताना खासदार डॉ. अनिल बोंडे म्हणाले,आता त्यांच्याकडे रडारड करण्याशिवाय काहीच उरलेले नाही. कधी भ्रष्टाचाराचे आरोप करायचे, पण ते सिद्ध करायचा प्रयत्न करायचा नाही. कधी ईव्हीएमवर आरोप, कधी मतदार यादीवर आरोप, पण मेहनत करायची तयारी नाही. हाच त्यांचा स्वभाव झाला आहे.ते पुढे म्हणाले की,काँग्रेससोबत राहिल्यामुळे त्यांनाही तीच लागण झाली आहे - आरोप करायचे आणि मग पळ काढायचा.राहुल गांधींच्या जर्मनीतील वक्तव्यावर टीकाकाँग्रेस खासदार व लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी जर्मनीत दिलेल्या वक्तव्यावरही डॉ. अनिल बोंडे यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.देशाचा विरोधी पक्षनेता परदेशात जाऊन आपल्या देशाविरोधात वक्तव्य करतो, ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे, असे ते म्हणाले.ते पुढे म्हणाले,देशात असताना राहुल गांधी संविधान, ईव्हीएम आणि मतदार यादीवर प्रश्न उपस्थित करतात. पण देशाबाहेर गेल्यावर भारत आणि भारतीयांबद्दल नकारात्मक वक्तव्य करतात. यामुळे प्रत्येक भारतीयाला दुःख होते आणि लाज वाटते. परदेशात जाऊन भारतमातेच्या बाजूने एक शब्दही न बोलता देशवासीयांविरोधात बोलणे हे अत्यंत लज्जास्पद आहे, असे डॉ. अनिल बोंडे यांनी स्पष्ट केले.

# अमरावती मनपा निवडणूक एकत्रित लढणार डाव्या व राष्ट्रवादी (शरद पवार) आघाडीची घोषणा




**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४अमरावती**

अमरावती महानगरपालिका निवडणूक एकत्रितपणे लढण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार गट), भारतीय कम्युनिस्ट पक्ष , अखिल भारतीय फॉरवर्ड ब्लॉक आणि रिपब्लिकन पक्ष (खोरीपा/खोब्रागडे गट) यांनी घेतला आहे. भारतीय संविधानाच्या मूल्यांना बांधील राहून आणि शहराच्या सर्वांगीण विकासाला केंद्रस्थानी ठेवून ही आघाडी निवडणूक रणांगणात उतरणार असल्याची माहिती आज पत्रकार परिषदेत देण्यात आली.या आघाडीतील नेत्यांनी स्पष्ट केले की, अमरावती महानगरपालिकेचा विकास हा केवळ घोषणांपुरता मर्यादित न राहता प्रत्यक्ष कृतीतून साध्य करण्याचा आमचा संकल्प आहे. शहरातील पायाभूत सुविधा, पाणीपुरवठा, स्वच्छता, आरोग्य, शिक्षण, सार्वजनिक वाहतूक, झोपडपट्टी पुनर्वसन, रोजगारनिर्मिती आणि पारदर्शक प्रशासन या मुद्द्यांवर आधारित सविस्तर विकास आराखडा लवकरच जाहीर करण्यात येणार आहे.भारतीय कम्युनिस्ट पक्षातर्फे कॉ. सुनिल घटाळे, कॉ. निळकंठ ढोके, कॉ. जयेंद्र भोगे, कॉ. उमेश बनसोड यांनी संयुक्त आघाडीला पाठिंबा दर्शवला. अखिल भारतीय फॉरवर्ड ब्लॉकतर्फे बाळासाहेब कोराटे, प्रा. क्रांती महाजन, व्युतिछ विखेद ठोसर, नंदकिशोर काळमेघ, सचिन मुंदाणे, निरंजन कठाने आणि स्वप्नील नवले सहभागी आहेत.राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) गटाकडून प्रा. हेमंत देशमुख, मंगेश भटकर, निखिल देशमुख, सैय्यद मंसूर आणि विशाल बोरखडे यांनी भूमिका मांडली. तर रिपब्लिकन पक्ष (खोरीपा) कडून पंजाबराव रामटेके, सुरेश दहिकर, अॅड. दिलीप घरडे आणि डॉ. धनराज कावरे यांनी आघाडीच्या निर्णयाचे समर्थन केले.नेत्यांनी सांगितले की, लोकशाही, सामाजिक न्याय आणि संविधानिक मूल्ये जपणारा सक्षम पर्याय अमरावतीच्या मतदारांना देणे हा या एकत्रित लढ्याचा मुख्य उद्देश आहे. त्यामुळे येणाऱ्या महानगरपालिका निवडणुकीत ही आघाडी निर्णायक ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# आता उपाध्यक्ष, सभापतीपदासाठी मोर्चेबांधणी; सत्ताकेंद्रात हालचाली

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४ अमरावती**



नगराध्यक्षपदाच्या निवडणुका निर्विघ्नपणे पार पडून विजयी उमेदवारांना प्रमाणपत्रही मिळाले. नवनिर्वाचित नगराध्यक्षांचा खुर्चीवर बसण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. आता फक्त गॅझेटची प्रतीक्षा तेवढी बाकी आहे. त्यानंतरच मुहूर्त निघणार आहे. त्यापूर्वी उपाध्यक्षपद आणि सभापतीपदांसाठी फिल्डिंग लावणे सुरू झाले आहे. त्यामुळे राजकीय हालचाली वाढल्या आहेत.धामणगाव रेल्वे पालिकेत भाजपाचे बहुमत आहे. त्यामुळे धामणगाव वगळता इतर नगर पालिकांमध्ये उपाध्यक्षपदासाठी रस्सीखेच होण्यासारखी स्थिती आहे.

# सूर्यमालेतील सर्वात मोठा ग्रह १० जानेवारीला पृथ्वीजवळ येणार



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४अमरावती**

आपल्या सूर्यमालेतील सर्वात मोठा ग्रह गुरु हा १० जानेवारीला अगदी सूर्यासमोर येत आहे. या घटनेला खगोलशास्त्रात 'प्रतियुती' असे म्हणतात. या दिवशी गुरु आणि सूर्य आमने-सामने राहील. प्रतियुतीच्या काळात ग्रहाचे पृथ्वीपासूनचे अंतर हे सरासरी कमी असते. त्यामुळे खगोल अभ्यासकांना व जिज्ञासूंना गुरुचे निरीक्षण व अभ्यास करण्याची ही एक चांगली संधी असते.

गुरुच्या लागोपाठ प्रतियुतीमधील काळ हा साधारण तेरा महिन्यांचा असतो. याआधी ७ नोव्हेंबर २०२४ रोजी गुरु-सूर्य प्रतियुती झाली होती. पृथ्वीपासून गुरुचे सरासरी अंतर हे ९३ कोटी किमी. आहे. गुरुचा व्यास १,४२,८०० किमी. आहे. या ग्रहाला सूर्याभोवती एक फेरी मारण्यास ११.८६ वर्ष लागतात. गुरुला एकूण ७९ चंद्र आहेत. टेलिस्कोप मधून गुरुचे निरीक्षण केले असता गुरुवरचा पट्टा व ४ चंद्र दिसतात. ७ डिसेंबर १९९५ रोजी मानवरहित यान 'गॅलिलीओ' गुरुवर पोहचले. त्यामुळे या ग्रहाविषयी अधिक माहिती मिळू शकली. गुरुवर जीवसृष्टी असल्याचा कोणताही पुरावा अजूनपर्यंत मिळाला नाही. पण, या सर्वात मोठ्या ग्रहाविषयी कुतूहल आहे.

पृथ्वीपेक्षा गुरु हा ११.२५ पट मोठा आहे. रक्तरंगी ठिपका हे एक गुरुचे खास वैशिष्ट्य आहे. 'ग्रेट रेड स्पॉट' या नावाने हा ठिपका ओळखला जातो. हा ठिपका ४० हजार किमी लांब आणि १४ हजार किमी रुंदीचा अवाढव्य आकाराचा आहे. या ठिपक्यात पृथ्वीसारखे ३ ग्रह एकापुढे एक ठेवता येतील. न्यूटनच्या काळापासून म्हणजे जवळजवळ ३०० वर्ष हा ठिपका खगोल शास्त्रज्ञ पाहत आले आहेत. या ठिपक्याचे निरीक्षण केले असता ते एक प्रचंड चक्रीवादळ असल्याचे सहज लक्षात येईल. गुरुवर सतत घोंगावणारे चक्रीवादळ एका विशिष्ट ठिकाणीच का निर्माण झाले याचे कारण मात्र अजूनही अज्ञात आहे.

१० जानेवारी रोजी सूर्यास्तानंतर थोड्याच वेळात गुरू ग्रह पूर्व क्षितीजावर उगवेल आणि पहाटे पश्चिमेकडे मावळेल. हा ग्रह अत्यंत तेजस्वी दिसत असल्याने तो सहज ओळखता येईल. व साध्या डोळ्याने पाहता येईल. खगोलप्रेमी आणि जिज्ञासूंसाठी ही संधी आहे. परंतु गुरुवरचा ग्रेट रेड स्पॉट व युरोपा, गॅनीमीड, आयो व क्लेस्टो हे गुरुचे चार चंद्र साध्या डोळ्याने दिसू शकणार नाही. यासाठी टेलिस्कोपची आवश्यकता आहे, अशी माहिती मराठी विज्ञान परिषद, अमरावती विभागाचे हौशी खगोल अभ्यासक विजय म. गिरुळकर व प्रवीण गुल्हाने यांनी दिली आहे.

# रोही आडवा आल्याने दुचाकी अपघात; युवकाचा उपचाराअगोदरच मृत्यू

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४तिवसा**



तिवसा-कुऱ्हा मार्गावरील भांबोरा लालमाती परिसरात रोही अचानक रस्त्यावर आडवे आल्याने झालेल्या दुचाकी अपघातात महेश प्रदीप पोल्हाड (वय ३०, रा. भांबोरा) यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. ही घटना बुधवारी, दि. २४ डिसेंबर रोजी दुपारी सुमारे १.३० वाजताच्या सुमारास घडली. या घटनेमुळे भांबोरा व परिसरात तीव्र हळहळ व्यक्त करण्यात येत असून शोककळा पसरली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, महेश पोल्हाड हे नांदगाव पेठ येथील एमआयडीसीत सोफिया कंपनी मध्ये असल्याने ते नेहमीप्रमाणे कामावर जाण्यासाठी आपल्या इलेक्ट्रिक दुचाकी (क्रमांक एम.एच. २७ इ ए ०३६३) ने निघाले होते. शेंदूरजना बाजार ते कुऱ्हा मार्गावरील भांबोरा जवळील भागात अचानक जंगली रोही रस्त्यावर आडवे आले. या अनपेक्षित घटनेत दुचाकीची जोरदार धडक होऊन महेश पोल्हाड गंभीर जखमी झाले. अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी तत्काळ मदत करून त्यांना तिवसा उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. मात्र डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने पुढील उपचारासाठी त्यांना अमरावती येथे हलविण्यात आले. दुर्दैवाने अमरावती येथे उपचार सुरू होण्यापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला.

महेश पोल्हाड यांच्या मृत्यूने परिसरात शोककळा पसरली असून त्यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी व चार वर्षांचा मुलगा असा परिवार आहे. कुटुंबाचा आधार हरपल्याने नातेवाइकांचा आक्रोश हृदय पिळवटून टाकणारा आहे. दरम्यान, या घटनेप्रकरणी तिवसा पोलीस ठाण्यात नोंद घेण्यात आली असून पुढील तपास तिवसा पोलीस करीत आहेत.

# विदर्भात १८ डिसेंबरपर्यंत केवळ २७.६ लाख क्विंटल कापसाची खरेदी; कापूस महामंडळाची हायकोर्टात माहिती

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४नागपूर**



विदर्भामध्ये सध्या ४०० कापूस खरेदी केंद्रे कार्यरत असून १८ डिसेंबरपर्यंत तीन लाख ३४ हजार ७६९ शेतकऱ्यांनी कापूस विक्रीसाठी नोंदणी केली होती. दरम्यान, त्यांच्याकडून केवळ २७ लाख ५ हजार ६३७ क्विंटल कापूस खरेदी करण्यात आला. भारतीय कापूस महामंडळाने मंगळवारी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात प्रतिज्ञापत्र दाखल करून ही माहिती दिली.

४०० पैकी ३४६ कापूस खरेदी केंद्रे जिनिंग अॅण्ड प्रेसिंग फॅक्टरीमध्ये सुरू आहेत. या केंद्रांची शेतकऱ्यांना माहिती देण्यासाठी विविध माध्यमांतून जाहिरात करण्यात आली, असेदेखील महामंडळाने सांगितले. कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या हिताकरिता ग्राहक पंचायत महाराष्ट्रचे जिल्हा सचिव श्रीराम सातपुते यांनी जनहित याचिका दाखल केली आहे. त्यावर न्यायमूर्तिद्वय अनिल किलोर व रजनीश व्यास यांच्यासमक्ष सुनावणी झाली. त्यानंतर न्यायालयाने महामंडळाचे प्रतिज्ञापत्र रेकॉर्डवर घेऊन न्यायालय मित्र अॅड. पुरुषोत्तम पाटील व सातपुते यांना त्यातील माहितीची सत्यता तपासण्यास सांगितले.

या प्रकरणामध्ये कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्या व मागण्या मांडण्यात आल्या आहेत. यासंदर्भात भारतीय कापूस महामंडळाने प्रामाणिकपणे विचार करायला पाहिजे. महामंडळाने जे काम करायला हवे, ते काम न्यायालय मित्र अॅड. पुरुषोत्तम पाटील व याचिकाकर्ते श्रीराम सातपुते करीत आहेत, असे मत न्यायालयाने या वेळी व्यक्त करून प्रकरणावर १६ जानेवारी रोजी पुढील सुनावणी निश्चित केली.


आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
विदर्भ प्रजासत्ताक
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत